

# अन्नदाता सुखी भव:

**भाग्यश्री पाटील**

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

www.esahity.com
esahity@gmail.com

# अन्नदाता सुखी भव

लेखिका : भाग्यश्री पाटील

# अन्नदाता सुखी भव

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अन्नदाता सुखी भव

लेखिका भाग्यश्री शिवाजीराव पाटील

असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट

SMSMPITR, अकलूज

मोबाईल: ९०९६८११२७१

ई-मेल: bhagayshri1271@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ सप्टेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अन्नदाता सुखी भवः

भाग्यश्री पाटील

नमस्कार!



माझे नाव भाग्यश्री पाटील. मी व्यवसायाने एक इंजिनिअर असून अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंग अँड रिसर्च मध्ये असिस्टंट प्रोफेसर या पदावर कार्यरत आहे.

लेखन आणि वाचन याची आवड मला कॉलेज मध्ये गेल्यापासून लागली. साने गुरुजी, अण्णाभाऊ साठे, शिवाजी सावंत, बाबासाहेब पुरंदरे, यांची पुस्तके वाचून वाचूनच मला लेखनाची आवड कधी लागली समजलाच नाही. शेतकरी, त्यांचे प्रश्न, समाजासमोर मांडूनच काहीतरी बदल घडू शकतो असे मला वाटते. याच भावनेतून निर्माण झालेले हे पुस्तक.

शेतकरी हा तर सगळयांच्याच जिव्हाळयाचा विषय. त्याचा त्रास त्याची होणारी फरफट सर्वानाच दिसते पण त्याची नक्की मदत कशी करावी हेच समाजात नाही. म्हणून, आपणही एक होऊन त्याचसाठी काहीतरी करू शकतो हेच या लिखाणातून मला सर्वांसमोर मांडायचे आहे. माझ्यासाठ लेखन ही गोष्ट जरी नवीन असेल तरी माझ्या पुस्तकात मांडलेल्या भावना मात्र अत्यंत प्रामाणिकपणे आणि निस्वार्थीपणे मांडलेल्या आहेत. त्या वाचकांपर्यंत नक्की पोचतील असा मला विश्वास आहे. या लेखनाचा हेतू फक्त विचारणा नवीन दिशा देणे आहे. हे लेखन सर्वाना एक नवीन दिशा देईल तसेच पुस्तकाला मिळणार प्रतिसाद माझ्यातल्या लेखिकेला अजून नवीन आणि सुंदर लेखन करण्यास प्रवृत्त करेल हीच आशा

**प्रा. भाग्यश्री पाटील**

अकलूज

# मनोगत

भारत हा शेतीप्रधान देश आहे. प्राचीन काळापासून कित्येक लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे शेती, शेतकरी हा सर्वांचाच खुप जिव्हाळ्याचा विषय आहे. शेतकऱ्याला अन्नदाता, कष्टकरी, पोशिंदा या नावांनी संबोधले जाते. या क्षेत्रात हरितक्रांती, धवलक्रांती, जलक्रांती, यांसारख्या वेगवेगळ्या क्रांती होत आहेत. देश प्रगती करत आहे.

या पुस्तकात कोणतेही तत्वज्ञान नाही, कोणताही उपदेश नाही. आहेत ते नवीन विचार आणि नवीन दृष्टिकोन!

आज देशाने कितीही प्रगती केली असली तरी शेतकरी हा म्हणावा तितका प्रगती करताना दिसत नाही. दुष्काळ, अवकाळी पाऊस, कर्जबाजारीपणा आणि त्यातुन येणारे नैराश्य यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. काहीही करून हे थांबले पाहिजे. त्यासाठीच या भल्या मोठ्या जगात या अडचणींवर मात करण्यातला खारीचा वाटा म्हणुन मी माझे विचार या पुस्तकाच्या माध्यमातून मांडत आहे.

आजूबाजूला अशा गोष्टी पाहिल्या की मन खुप अस्थिर होतं. जगाला अन्न पुरविणाऱ्या पोशिंद्याची परिस्थिती इतकी खराब व्हावी आणि जगानेही ती पाहावी याचे वाईट वाटते. योग्य मार्गदर्शन आणि योग्य पाठबळ लाभले तर सर्वांच्या साथीने आपण नक्कीच या संकटावरही मात करू शकतो. हो ! मी याला समस्या न म्हणता संकट म्हणतेय, कारण आज शेतकऱ्यांची अशी अवस्था बघून तरुण पिढी शेती करण्यास पुढे येत नाही. त्यामुळे जर भारत शेतीप्रधान देशच राहीला नाही तर अन्नधान्य बाहेरून आयात करावे लागेल आणि असे झाले तर ते एक खूप मोठे संकट ठरेल आणि कदाचित याला जबाबदार आपणच असू.

**एकमेकां साहाय्य करू..अवघे धरू सुपंथ..** याप्रमाणे काम करत राहिलो तर यश नक्कीच मिळेल. सर्वांना सोबत घेऊन प्रगती केली तर तो प्रगतीचा सर्वोच्च बिंदू ठरेल असे मला वाटते, आणि हे अशक्य मुळीच नाही. आपापल्या परीने सर्वांनी जमेल तसा प्रयत्न केला तर हे नक्कीच साध्य होईल. भविष्यातला धोका ओळखून सर्वच या महान कार्यास हातभार नक्की लावतील हा माझा आत्मविश्वास आहे. कित्येक ठिकाणी या कार्यास चांगली सुरुवात झालेली दिसत आहे. गरज आहे ती सर्वांनीच यात सहभाग घेण्याची.

**प्रा. भाग्यश्री पाटील**

अकलूज

# अनुक्रमणिका


| अक्र | प्रकरण | पान क्र. |
|---|---|---|
| १ | पोशिंद्याची ओळख नव्याने | १ |
| २ | नेमके कुठे चुकते? | ६ |
| ३ | समस्या सोडविण्याच्या नवीन दिशा | ११ |
| ४ | पाणी फाऊंडेशन: जलक्रांतीची सुरुवात | १५ |
| ५ | स्वामिनाथन आयोग: एक वरदान | १९ |
| ६ | शेतकरी आणि समाज | २२ |
| ७ | लोकजागृतीची गरज | २५ |
| ८ | कॅन्सरला आमंत्रण | २८ |
| ९ | शेतकऱ्याचे मनोगत | ३१ |
| १० | फक्त लढ म्हणा ! | ३४ |

# १. पोशिंद्याची ओळख नव्याने

**अन्नदाता सुखी भव:**

घरात गृहीणीने सुंदर स्वयंपाक केला, तो सर्वांनी आवडीने पोटभरून खाल्ला, सर्वांचे मन आणि पोट तृप्त झाले की आपसुकच तोंडातून बाहेर पडणारे वाक्य, "**अन्नदाता सुखी भव:**" यातल्या प्रार्थना या गृहिणीसाठीच नाही तर ते अन्न ज्याच्यामुळे आपल्यापर्यंत पोचतं अशा अन्नदाता शेतकऱ्यांचाही असाव्यात, आणि का असु नये? ऊन, वारा, पाऊस अंगावर झेलत घाम गाळत पिकवलेले धान्य हे अनमोल आहे.

पण कधी कधी एक मोठा प्रश्न पडतो तो असा की खरंच अन्नदाता सुखी आहे? शेतकरी समजलाय का आपल्याला? आणि समजला असेल तर किती? तोही एक माणूस आहे, तुमच्या आमच्यासारखा. त्यालाही मन आहे, भावना आहेत, कुटुंब आहे. म्हणूनच मला गरज वाटते ती पोशिंद्याची नव्याने जगाला ओळख करून देण्याची! ही ओळख फक्त जगालाच नाही तर शेतकऱ्यालाही स्वतःला होणे गरजेचे आहे कारण जोपर्यंत असे होत नाही तोपर्यंत त्याचे सामर्थ्य त्याला कळणार नाही आणि सामर्थ्य कळल्याशिवाय नैराश्य दूर होणार नाही.

आतापर्यंत जो शेतकरी सर्वांनी पाहिलाय किंवा सर्वांना समजलाय त्याचे वर्णन करायचे झाले तर पुढीलप्रमाणे असेल.

माणसाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, पण त्याही व्यवस्थितपणे पुरवता न येणारा शेतकरी..अशिक्षित.. दुर्बल.. आणि परिस्थितीने खचलेला शेतकरी..”

***नको पांडुरंगा मला सोन्या चांदीचे दान रे ..***

***फक्त भिजव पांडुरंगा हे तहानलेले रान रे..***

***कमरेवरच्या हात सोडून आभाळाला लाव..***

***ढगाला थोडे हलवून भिजव माझा गाव..***

असे म्हणत पावसासाठी पांडुरंगाला आर्त हाक देणारा वारकरी शेतकरी. आतापर्यंत हीच ओळख आहे शेतकऱ्याची, पण हीच ओळख बदलायची आहे.

जे हात जगाला अन्न पुरवतात त्यांची ओंजळ रिकामी राहता कामा नये, जे खांदे इतरांना आधार देतात ते निराधार होता कामा नये, जे जगाचे पोट भरतात ते कधीच उपाशी झोपू नये. सर्वात महत्वाचे म्हणजे जे मन निस्वार्थीपणे कष्ट करून सर्वांना अन्नाच्या रूपाने नवजीवन देते ते कधीच खचू नये आणि हे सर्वांचेच कर्तव्य आहे.

आठवड्याच्या बाजारात गेलं आणि तिथं चेहऱ्यावर तेज आणून आपल्या कष्टाचे धान्य, भाजीपाला विकणारे शेतकरी पाहिले की खूप कौतुक वाटतं. शेतात कष्ट करायचे आणि दर आठवड्याला आपले धान्य, भाजीपाला, फळे विकायला घेऊन यायचे. त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर जो उत्साह, जे हास्य, जे समाधान असते ते खरंच कौतुकास्पद आहे. भाजी, धान्य घेतले की सढळ हाताने मोजमापापेक्षा किंचित जास्तच देणारे ते हात, प्रत्येक माणसाशी प्रेमाने बोलण्याची तयारी, ती बोलण्यातली आपुलकी, कुणी भाव कमी करून मागितला तरी मोठ्या मनाने "बरं घ्या" म्हणून देण्याची तयारी. या गोष्टी एक भावनिक नातं निर्माण करतात. किती मोठ्या मनाचा असतो शेतकरी ! पैशाने श्रीमंत नसेलही कदाचित, पण मनाची श्रीमंती मात्र खूप.

या सगळ्यात एक विरोधाभास मात्र दिसतो तो असा की शेतकऱ्याचा समाजाकडे, समाजातल्या लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोन जितका प्रेमळ आणि पवित्र आहे तितकासा समाजाचा त्याच्याकडं बघण्याचा प्रेमळ दृष्टिकोन दिसत नाही. शेतकऱ्याने घाम गाळून पिकवलेले धान्य अनमोल आहे. त्याची किंमत खरंच तुम्ही आम्ही ठरवू शकतो का? आपण स्वतः कष्टाने एखादी गोष्टी मिळवली किंवा बनवली तर आपण तिला किती जपतो.

आपल्यासाठी ती कितीतरी अनमोल असते. तिचे मूल्य आपल्याला पैशात ठरवता येत नाही. पण जेव्हा दुसऱ्या कुणाच्या तरी वस्तूची किंमत ठरवण्याची वेळ येते तेव्हा आपली तीच भूमिका का राहत नाही? शेतकरी इतक्या कष्टाने धान्य पिकवतो आणि आपण त्याच कष्टाचा उत्पन्नाला एका मिनिटात कवडीमोल ठरवतो. त्याची किंमत कमी करतो. हे कितपत योग्य आहे? आपण  एखादी दुसरी गोष्ट ऑनलाइन किंवा दुकानात तिच्या मूळ किमतीपेक्षा कितीतरी जास्त किंमत देऊन घेतो पण कष्टाची शुद्ध भाजी, फळे काही ना काही कमी किमतीतच दिली पाहिजेत हीच आपली अपेक्षा असते. याने कदाचित आपल्याला काहीतरी पैसे वाचवल्याचे क्षणिक समाधान मिळेल पण आपलेच पोट भरावे, आपल्याला अन्नधान्य मिळावे म्हणून कष्ट करणाऱ्या त्या कष्टकऱ्यांचे मन दुखावले, त्याच्या कष्टाची किंमत कमी केली हे जेव्हा आपल्या लक्षात येईल तेव्हाच कुठंतरी शेतकरी हा माणूस समजेल.

देश प्रगतीपथाकडे वाटचाल करत आहे. नवनवीन संशोधने होत आहेत. सर्व गोष्टी वेगाने बदलत आहेत. पण एक गोष्ट कधीही बदलणार नाही आणि ती म्हणजे पोटाची भूक. माणसाने कितीही पैसा कमावला, कितीही प्रगती केली तरी पैशाने पोट भरत नाही. ते भरायला अन्नच हवे. उद्या चालून अशी परिस्थिती निर्माण झाली की पैसा भरपूर आहे पण अन्नधान्याच उपलब्ध नसेल तर? काय होईल? कल्पनाच करवत नाही. डोळ्यासमोर अंधार येतो.

आजकालच्या डिजिटल युगात कोणी थोडे काही कार्य केले की त्याचा उदो उदो वर्तमानपत्र, न्युज चॅनेलवर झळकत असतो. नको तेवढे महत्व त्या व्यक्तीला दिले जाते आणि मग त्याच्यामध्ये अहंकार निर्माण होतो. पण कधी पाहिलंय का कुठल्या शेतकऱ्याचा सत्कार किंवा त्याला मानाचे स्थान दिलेले ? तो जगाला अन्न पुरविण्याचे महान कार्य करतो म्हणून त्याची कुणी दखल घेतलेली? दखल घेणे तर सोडाच पण आपण कधी प्रेमाने त्यांची चौकशी तरी करतो का? "मी आपली काही मदत करू शकतो का?" असे विचारणे तर सोडाच पण त्यांना कुणी प्रेमाचे दोन शब्दही बोलत नाही. बऱ्याच वेळा "ते त्याचे कामच आहे" असा पवित्रा घेतला

जातो. त्यांचा तिरस्कार केला जातो. एखादी वस्तू त्याने कमी भावात दिली नाही तर त्याचाशी वाद घातला जातो. त्याची त्यावेळी एकच अपेक्षा असते की एकवेळ पैसे देऊ नका पण प्रेमाने बोला. इतकेही आपण करू शकत नसेल तर आपल्यातली माणुसकी संपत चाललीय असेच म्हणावे लागेल.

शेतकरी हा स्वार्थी कधीच नसतो. तो कसलीच अपेक्षा करत नाही कुणी आपल्या महान कार्याची दखल घेत नाही म्हणून तो रडतही बसत नाही. त्याचे समाजहिताचे कार्य अविरतपणे चालू असते, कारण त्याला माहित आहे त्याने काम करायचे बंद केले तर पूर्ण जगावर उपासमारीची वेळ येऊ शकते.

मला या लिखाणातून शेतकरी या महान व्यक्तीची नवीन ओळख करून द्यायची आहे, त्यामुळे मी स्वतःशी एक गोष्ट ठरवली आहे. ती अशी की, या व्यक्तीला दुर्बल किंवा खचलेला म्हणून मी स्वतःही बघणार नाही आणि समाजालाही एक असा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करेन जेणेकरून स्वतः शेतकरी आणि समाज दोघेही या व्यक्तीकडे एक सामर्थ्यवान माणूस म्हणून पाहतील. शेतकऱ्याचा सामर्थ्याचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे जो व्यक्ती जगाचा पोशिंदा म्हणवला जातो जो जगाची भूक भागवतो तो दुर्बल कसा असेल?

आता शेतकऱ्याला त्याच्या शक्तींची सामर्थ्याची जाणीव करून देणे गरजेचे झाले आहे. अजून एक गोष्ट आनंदाने आणि अभिमानाने सांगावीशी वाटते. ती अशी की आजपर्यंत कित्येक समाजसुधारक, थोर विचारवंत, सुप्रसिद्ध डॉक्टर्स, इंजिनिअर्स, लष्करातील अधिकारी, सैन्यातील वीर जवान, थोर शास्त्रज्ञ, प्राध्यापक, जगाच्या नकाशावर भारताचे नाव उंच करणारे खेळाडू, विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती या शेतकरी कुटुंबानीच समाजाला दिलेल्या आहेत, आणि मी हे धर्मनिरपेक्ष आणि जातीभेद विसरून सांगत आहे, कारण शेती करणारा वर्ग हा एकाच जाती धर्माचा नाही तो विविध जाती धर्मांचा आहे. पण इथे जाती धर्मापेक्षा त्यांनी केलेले कार्य कितीतरी मोलाचे आहे. म्हणजेच जगाचे पोट भरता भरता त्याला

प्रगतीपथावर नेण्याचे कामदेखील शेतकरी करत आहे. त्यासाठी त्याचे किती आणि कसे आभार मानावे!

इतके सगळे असताना प्रश्न पडतो की जो जगासाठी इतकं करतो तो स्वतःच्या कुटुंबाचा भार उचलण्यास असमर्थ कसा? तो मनाने कसा खचतो?

तो जगाला पोसतो, तो स्वतःच्या मुलाबाळांना शिकवून खूप खूप मोठे करण्याचे स्वप्न बघतो, तो त्याचा पूर्ण जन्म काळ्या मातीमध्ये कष्ट करण्यात घालवतो. तो आपल्या गाई, बैलांवर आपल्या लेकरांप्रमाणे प्रेम करतो त्यांना कुठे लागले जखम झाली तर त्याचेही मन हळहळते. जितक्या जिद्दीने आणि कणखरपणे तो नैसर्गिक आपत्तींना सामोरे जातो तितकाच तो हातातोंडाशी आलेले पीक हातचे गेल्यावर हळवा होतो. पण तरीही स्वार्थ, द्वेष, अहंकार, प्रतिशोध या भावना त्याच्या मनाला शिवतही नाहीत. तो त्रासात अडचणीत असेल तर दुसऱ्या कुणाला आपले दुःख सांगून दुखी करण्यापेक्षा स्वतःचे आयुष्य संपवणे पसंत करतो. निसर्गाने साथ दिली नाही म्हणून तो निसर्गाचा तिरस्कार करत नाही आणि समाजानेही साथ दिली नाही तरी तो समाजाचाही तिरस्कार करत नाही. त्याला फक्त निस्वार्थीपणे देणे माहित आहे. मग त्याचे दुःख किंवा त्रास आपण जाणून आपल्याला जमेल त्या मार्गाने त्याची मदत करू शकलो चालणार नाही का? आणि त्याची मदत हीच आपली मदत ठरणार आहे.

आजच्या सिमेंट काँक्रीटच्या युगात शेती, वाडा, तुळशी वृंदावन, अंगण, परसबाग, विहीर हे शब्द कित्येक मुलांना माहीतच नाहीत आणि बघायचे झाले तरी ऑनलाइन किंवा फोटोमध्ये. कदाचित हे शब्द हे विचार जुनेही वाटू शकतील पण यातच खरी मजा होती, आनंद होता हेदेखील आपल्याला मान्य करावे लागेल. एक धक्कादायक बाब अशी आहे की जेव्हापासून पाश्चात्य संस्कृती आणि त्यातले विविध खाद्यपदार्थ बाजारात दाखल झाले आहेत आणि आपण ते खाऊ लागलो आहोत तेव्हापासून कॅन्सर, मधुमेह, हार्टअटॅक असे फॅशनेबल रोग लोकांना होऊ लागले आहेत. यापूर्वी हे रोग नव्हते अशातला भाग नाही. या आधी पण हे रोग होते पण

त्याचे प्रमाण खूपच कमी होते. इतके कमी की ही नावेसुद्धा बऱ्याच लोकांना माहित नव्हती. जे कष्टकरी शेतकरी किंवा जे लोक स्वतःच्या शेतातील किंवा नैसर्गिक फळे, भाज्या खातात, नियमित कष्ट करतात, विहिरीचे स्वच्छ पाणी पितात, रात्रीची शांत झोप घेऊन सकाळी सूर्योदयाच्या आधी उठतात, शुद्ध हवा घेतात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्मार्टफोन हा प्रकार त्यांना माहित नाही अशा लोकांमध्ये हे फॅशनेबल आजार क्वचितच दिसतील किंवा दिसणारच नाहीत. पण पिझ्झा, बर्गर, चायनिज, कोल्ड ड्रिंक्स यासारख्या पदार्थांचे सर्रास सेवन केल्यामुळे शरीराची हानी होत आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषण होत आहे. मग मोकळी आणि शुद्ध हवा मिळणार कशी? असेच चालत राहिले तर एक दिवस असा येऊ नये की प्रत्येकाला स्वतःचा ऑक्सिजन सिलेंडर विकत घ्यावा लागावा.

या गोष्टी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. आपण जर शेतकऱ्यांना सबळ करण्यात मागे राहिलो तर ते त्यांचेच नाही तर सर्वांचेच नुकसान आहे हे समजून घेतले पाहिजे. बाहेरील देशातून बाकीच्या गोष्टी तर आयात करतच आहोत पण जर अन्न, धान्य, फळे, भाज्या हेही आयात करावे लागले तर त्यासोबत रोगराईही आयात होईल हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्याला शुद्ध फळे, भाज्या, धान्य उपलब्ध आहे त्याच्या पुरेपूर फायदा घ्यावा आणि ते उत्पादन करण्यासाठी आपल्या पोशिंदाला आपल्याला जमेल ती मदत करावी. तसेच त्यांच्याकडून कुठलेही उत्पन्न खरेदी करताना कसलीही हुज्जत घालू नये. ते मिळेल त्या किमतीत घ्यावे, कारण ते अनमोल आहे आणि शेतकरीही अनमोल आहे.

************************************************************************************

# २. नेमके कुठे चुकते ?

गेल्या काही वर्षात कितीतरी शेतकऱ्यांनी आपल्या शेतीचे झालेले अतोनात नुकसान आपल्या डोळ्यांनी पाहीले आहे. हातातोंडाशी आलेले पीक जेव्हा अवकाळी पावसामुळे किंवा दुष्काळामुळे आपल्या हातून गमावले जाते तेव्हा मनाला कितीतरी यातना होत असतील. साहजिकच असं झालं तर शेतकरी खचणारच. पण हे सर्व थांबवायचं असेल तर नेमके कुठे चुकते आहे ते शोधून त्यादिशेने पावले उचलणे मला खूप महत्वाचे वाटते. माझ्या माहितीप्रमाणे आज शेतकऱ्याची जी अवस्था आहे त्याला जबाबदार काही घटक आहेत ते खालीलप्रमाणे :

**१) निसर्गाचा अंदाज न घेता उत्पन्न घेणे**

प्रत्येक पिकासाठी लागणारे हवामान, पाणी या गोष्टी निसर्गावर अवलंबून आहेत. म्हणजेच शेतीच निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे कुठल्या ऋतूमध्ये कुठले पीक घ्यावे, जर दुष्काळाची चिन्हे असतील तर कमी पाण्यात येणारे पीक कोणते? या बाबींचा विचार करून उत्पन्न घेतले तर निश्चितच फरक पडेल असे मला वाटते. तसेच पाणी आडवा पाणी जिरवा, शेततळे यासारखे उपक्रम देशील शेतीमध्ये महत्वाचे आहेत.

**२) योग्य मार्गदर्शनाचा अभाव**

भारतातील बराचसा शेतकरी वर्ग हा अशिक्षित आहे. त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. जेणेकरून ते पारंपरिक शेती सोडून सुधारित शेतीपद्धतींचा अवलंब करतील. बऱ्याच वेळा कुठलेच मार्गदर्शन किंवा बाजारपेठांची माहिती न घेता पीक घेतले जाते त्यामुळे नुकसान होते.

**३) योजनांचा अभाव**

शासनाकडून शेतकऱ्यांसाठी कित्येक नवीन योजनांची घोषणा केली जाते पण खूपच कमी योजना थेट शेतकऱ्यांपर्यंत पोचतात. दुर्दैवाने काही योजना तर इतक्या उशिरा पोचतात की योजनेचा लाभ मिळेपर्यंत निराश झालेल्या शेतकऱ्याने वाट बघून जगाचा निरोप घेतलेला असतो.

**४) शेतमालाला हमीभाव न मिळणे**

शेतमालाला हमीभाव न मिळणे मिळणे याचे कारण बहुधा सर्वांना माहिती असावे. कित्येक वेळा पीक शेतामध्ये असते तोपर्यंत चांगला भाव असतो पण पीक बाजारात आले की अचानक भाव पडतात. शेतमाल हा नाशवंत असल्यामुळे अशा वेळी मिळेल त्या किमतीत शेतकऱ्याला तो विकावा लागतो आणि मग खर्चही निघत नाही अशी अवस्था होते. अचानक भाव कसे पडतात? हे कुठंतरी थांबले पाहिजे. उत्पादनाला पुरेश्या नफ्यासहित हमीभाव देणे गरजेचे आहे.

**५) दुष्काळ, अतिवृष्टी आणि कर्जबाजारीपणा**

दुष्काळ आणि अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्ती आहेत. त्यामुळे दुर्दैवाने अशा प्रकारचे संकट शेतकऱ्यांवर ओढावले तर त्यांना तात्काळ पिकवीमा किंवा नुकसान भरपाई मिळत नाही. पर्यायाने शेतकऱ्यांना खाजगी कर्ज काढावे लागते. आधीच पिकाच्या मिळणाऱ्या नफ्याच्या भरोशावर शेतकऱ्याने पेरणीसाठी खर्च केलेला असतो आणि परत नुकसान झाले तर अजून कर्ज काढावे लागते. यामुळे त्याला सहाजिकच नैराश्य येते आणि तो टोकाचे पाऊल उचलतो. हे थांबवायचे असेल तर शेतकऱ्याला गरजेच्या वेळी तात्काळ पीकविमा किंवा नुकसान भरपाई उपलब्ध करून दिली गेली पाहिजे.

भलेही आज माणूस आपल्या इच्छाशक्ती आणि बुद्धीच्या जोरावर चंद्रावर जाऊन पोचला आहे पण आजही अत्यंत दुर्गम भागात जिथे भीषण दुष्काळाचे सावट आहे, जिथे हंडाभर

पाण्यासाठी लोकांना कित्येक किलोमीटर पायपीट करावी लागते, जिथे चारापाण्याविना शेतकऱ्यांना आपल्या लेकरांप्रमाणे सांभाळलेली जनावरे विकण्याची वेळ येतेय, जिथे पाण्यावाचून प्राणी जीव सोडत आहेत अशा काही दुर्गम भागात पाण्याचे टँकर किंवा जनावरांसाठी चारापाणी, छावण्या, किंवा अत्यावश्यक सुविधा पोचू शकत नाहीत याची खंत वाटते. हे थांबवायचे असेल तर कारभारात सुसूत्रता आणून भ्रष्टाचार नेमका कुठे होतोय हे शोधून वेळीच त्याचा बंदोबस्त करणे जरुरीचे बनले आहे.

**६) भारनियमन**

देशातील बहुतांश गावांमध्ये विजेची समस्या कायम आहे. दिवसातले काहीच तास वीज उपलब्ध होते आणि बाकीचे तास भारनियमन चालू असते. त्यामुळे हेही शेतीसाठी एक आव्हानच ठरते. कितीतरी वेळा पिकांना पाणी द्यायचे असेल तर रात्र रात्र जागून द्यावे लागते कारण दिवसभर भारनियमन असते. मग अशा वेळी पाणी असून ते पिकांना देता येत नाही. याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे .

**७) अधिकारांची माहिती नसणे**

मतदान हा प्रत्येक माणसाचा अधिकार आहे. तो जर प्रामाणिकपणे वापरला गेला तर कल्याण करतो, पण क्षणिक अमिषाला किंवा दबावाला बळी पडून चुकीच्या माणसाच्या हातात सत्ता दिली तर नुकसान आपलेच होते. त्यामुळे कर्जमाफी, वीजबीलमाफी, पिकांना हमीभाव यांसारखे प्रश्न सोडवायचे असतील तर आपल्या अधिकाराचा योग्य वापर करून योग्य प्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे.

ही सर्व कारणे आहेत. कदाचित हे कारणमीमांसा करणं सोपं असेल पण जो माणूस प्रत्यक्षात या समस्यांना सामोरे जात असतो, परिस्थितीला तोंड देत असतो तोच या अडचणीतून

होणार त्रास समजू शकतो. तुम्ही आम्ही फक्त वाचन किंवा लिखाण करून हा त्रास नाही समजू शकत. पण हा त्रास कमी होण्यासाठी योगदान मात्र नक्की देऊ शकतो.

कदाचित नेमकं कुठे चुकतंय हे आपल्यापेक्षाही जास्त शेतकऱ्यालाही माहिती असेल. पण त्याच्याही काही अडचणी, काही हतबलता असू शकतील. फक्त त्या जाणून घेऊन त्याला आता आशावादी बनवण्याची गरज आहे. समाजासाठी तो किती महत्वपूर्ण आहे हे त्याला समजून सांगण्याची गरज आहे.

कितीतरी शेतकऱ्यांची मुले आपल्या आईवडिलांची पैशांची जमवाजमव करताना होणारी ओढाताण, त्यांचा त्रास, खालावत चाललेली आर्थिक परिस्थिती पाहू शकत नाहीत आणि कोवळ्या वयात आपले आयुष्य संपवतात. कित्येक मुली शिक्षणासाठी आणि लग्नाच्या खर्चासाठी आईवडिलांचे होणारे हाल पाहून जगाचा निरोप घेतात आणि समाज उद्याचा एक थोर विचारवंत, डॉक्टर, इंजिनिअर, गमावतो. हेसुद्धा थांबले पाहिजे. अशा बातम्या पहिल्या, ऐकल्या की खुप वाईट वाटतं. असे वाईट विचार मनात येणाऱ्या निष्पाप मुलींना मला एक मोठी बहीण म्हणून मला हेच आवाहन करावेसे वाटते की, असे विचार चुकूनही मनात येऊ देऊ नका. ज्या घरात मुलगी जन्माला येते ते घर खरंच खुप नशीबवान असते. मुलगी म्हणजे लक्ष्मी, मुलगी म्हणजे सरस्वती, तीच वेळप्रसंगी दुर्गा होत असते. मुली लक्ष्मीच्या पावलांनी घरात जन्म घेतात शिकतात आणि प्रसंगी दुर्गा होऊन आपल्या घरवरच्या समाजावरच्या संकटावर मात करतात. स्त्रीला निसर्गानेच ही शक्ती दिली आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाची शक्ती बना. त्यांना धीर द्या. कदाचित तुमची जिद्द, तुमचे धाडस तुमची उमेद बघून त्यांच्यातही बळ संचारेल. त्यांनाही लढण्याची ताकत मिळेल. याच विषयास अनुसरून माझ्या वाचनात आलेली एक सुंदर गोष्ट :

संध्याकाळची वेळ होती. बळीराम शेतातून आला असता घराच्या दारात त्याची मुलगी व मुलगा लाईट नसल्यामुळे चिमणी समोर घेऊन अभ्यास करत होते. हे पाहून बळीरामला बरे वाटले. तो म्हणाला, "पोरावो, खुप आभ्यास करा!", असे म्हणुन त्याने त्याच्या बायकोला,

लक्ष्मीला आवाज दिला आणि म्हणाला, "अगं लक्ष्मी! मला जेवायचं नाही हाय! तु सकाळी दिलेल्या भाकरीनं पोट माझ टच झाल हाय!" असं म्हणत माठातील पाणी पिण्यासाठी तो घरात गेला. घरात समशानाची शांतता! लक्ष्मी पण पाणी पीत होती. बळीराम म्हणाला, "तु कोरभर भाकरी खायना !" लक्ष्मी म्हणाली, "घरात धान्याचा एक दाणा पण नाही हाय, कशी बशी एक भाकरी केली हाय! आणि ती भाकरी मुलांना ठेवली हाय! ही भाकरी खाऊन पोरांना काय देणार म्हणुन कालची कोरभर भाकरी खाल्ली हाय! धनी तुम्ही पण कालची कोरभर भाकर ठेऊन तीच आज खाल्ली हाय. ते मला माहीत हाय ना"' बळीराम निशब्द झाला व काही काळ थांबुन म्हणाला, "लक्ष्मी काय कराव? पाऊस पाणी नाय हाय! त्यामुळे शेताचं समशान झालं हाय! शेतात काहीच नाय हाय? मग काय कराव मला समजत नाय हाय! आणि उद्या राखी पूनव पण हाय! आणि पोरीला एक राखी आणुन देण्याची आयपत राहिली नाय! काय कराव हे उमजत नाय? देव शेतकऱ्यावर का कोपला हाय? आणि कीती शेतकऱ्यांचा बळी घेणार हाय? काय माहीत? शेतात गेलं की पोटात कालवतंय! काय करावं तेपण समजत नाय?' म्हणून पोटभर पाणी पिऊन बळीराम बाहेर आला आणि म्हणाला, "पोरावो, बिगी बिगी चला, कोरभर भाकरी खावा!' दोन्ही पोर घरात आली. त्यांना सुद्धा घरची परिस्थिती ठाऊक होती. म्हणून पोर नुसती भाकर खात होती. बळीराम घरात आला. त्याची मुलगी विद्याजवळ येवून बसला. विद्या म्हणाली, "बाबा थोडं जेवा की! बळीराम म्हणाला, "आत्ताच तुझी आय आणि मी जेवलो हाय!" पण विद्याला घरची परिस्थिती काय आहे याची पुर्ण जाण होती. त्यामुळे ह्या चिमुकलीनं ना स्वता घास घेतला अन् तीच्या बापाला भरवला आणि बापाच्या डोळ्यातून पाणी आले! स्वत:ला सावरत बाबा शांत झाला. विद्या म्हणाली, "बाबा ऊद्या राखी पोर्णिम हाय. मला तुमच्या कडुन एक गोष्ट पाहिजे आहे ती तुम्ही देणार ना?" बळीराम हो म्हणाला आणि विद्या जेवण करुन झोपली! मात्र बळीराम जागाच होता. उद्या पोरगी काय मागनार, या विचाराने तो कासावीस होता. रात्रभर तो झोपला नाही. सकाळ झाली आणि बळीराम अंघोळ करुन गावात गेला. एक दोघाला हात ऊसने पैसे मागितले. परंतु त्यांनी नकार दिल्यामुळे बळीराम हाताश झाला. त्याला काय करावं हे समजत

नव्हतं. राख्या घेण्यासाठी सुद्धा पैसे नसल्यामुळे राख्या कशा घेऊन जायच्या, या प्रश्नाने बळीराम व्याकुळ होता. तो निराश होऊन घरी आला. विद्या घरी वाट पाहत बसली होती. बळीराम घरी आल्यावर विद्या म्हणाली, "बाबा कीती वेळ झालं कुठं गेला होताव? चला राखी बांधायची हाय!" बळीराम म्हणाला, "मी राखी आणली नाही?" विद्या म्हणाली, "माझ्याकडं राखी हाय." ९ बळीराम आश्चर्यचकित  झाला आणि म्हणाला, "तु राखी कोठून आणली हाय?" त्यावर विद्या म्हणाली, "बाबा तुम्ही मागच्या वर्षी करदुडा आणला होता, तोच मी जपुन ठेवला होता. त्याच्या गोंड्याच्या मी दोन राख्या बनवल्या हायत! एक भैय्या ला बांधली अन् एक तुमच्या साठी ठेवली हाय! हात पाय धुवा आणि मग मी तुम्हाला राखी बांधते!" असे विद्या म्हणाली. बळीराम राखी बांधून घ्यायला गेला. परंतु त्याच्या मनात विचार होता, की पोरगी रात्रीच म्हणाली हाय, काय तरी मागणार हाय? मात्र आपल्या जवळ दमडी पण नाही हाय? काय करावं? आणि पोरीला नाही म्हणालं तर, ही पोरगी जिवाला खाईल! हा विचार बळीरामला सतावत होता. हात पाय पुसून तो पाटावर बसला आणि मुलीनं ओवाळले आणि राखी बांधली आणि ती म्हणाली, "बाबा मी जे मागीन ते देणार ना? बळीराम हिम्मत करत म्हणाला, "माग". काय मागायच हाय ते माग. विद्या म्हणाली नक्की ना बाबा! हे ऐकून बळीरामच्या हृदयाचे ठोके वाढले आणि म्हणाला "बोल पोरी!". विद्या म्हणाली, "मला वचन द्या कशीबी परिस्थिती असली तरी  तुम्ही या परिस्थितीचा हिम्मतीने सामना करायचा! तुमच्या शिवाय आमचे कोण हाय या जगात? दुष्काळाला खचुन आत्महत्या करायची नाय?आणि मला आयुष्यभर साथ द्यायची ही ओवाळणी मला द्या!" हे ऐकून बळीराम आणि लक्ष्मीच्या डोळ्यातुन आश्रु वाहू लागले आणि बळीराम म्हणाला, "होय पोरी! मी दुष्काळाचा सामना करीन!पण आत्महत्या करणार नाही." हे वचन बळीराम ने विद्या ला दिले. त्यावेळी विद्याला जगातील सर्वात अनमोल ओवाळणी मिळाल्याचा अनंद झाला. तिच्या चेहऱ्यावरून तसं दिसत होतं!

यावरून मुलगी आणि वडील यांमधले भावनिक नाते दिसून येते पण त्याचबरोबर जर कुटुंबाने ठरवले तर तेही शेतकऱ्यांना कसे लढण्याचे बळ देऊ शकतात हे दिसून येते.

त्यामुळे शेतकरी असो किंवा त्याचे कुटुंब त्यांच्याशी संवाद खूप महत्वाचा आहे. तो त्रासात किंवा तणावाखाली असेल तर त्याचाशी बोललं पाहिजे. तो अडचणीत आहे म्हणून त्याला एकटे सोडणे किंवा त्याच्यापासून अंतर ठेवणे चुकीचे आहे. कित्येक वेळा अर्थिक पेक्षा भावनिक मदतसुद्धा मोलाचे काम करून जाते. शेवटी जगण्यासाठी पैसा, अन्न यापेक्षाही जास्त जगण्याची ईच्छा, उमेद जास्त आवश्यक असते आणि ती प्रत्येकात निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी गावातल्या ग्रामसभांनाही सर्व गावकऱ्यांनी नियमित हजेरी लावली पाहीजे. कित्येक गावात ग्रामसभा या कागदोपत्रीच होतात. तसेच ग्रामसभांमध्ये गावातल्या अडचणींपेक्षा वैयक्तिक हेवेदावे, वाद, यासारख्या गोष्टींचेच प्रमाण जास्त असते. असे न करता ग्रामसभेत आपले प्रश्न मांडले पाहीजेत.

## ३. समस्या सोडविण्याच्या नवीन दिशा

शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी आजपर्यंत कित्येक विचारवंत समाजसेवक, कृषी खात्यातील तज्ज्ञ मंडळी यांनी विविध उपाय सुचवलेले आहेत. तरीही या समस्या कमी होताना दिसत नाहीत. याचे कारण मला असे वाटते की शेतकरी वर्ग हा पारंपरिक शेती करत असल्यामुळे शेती क्षेत्रातले बरेच संशोधने बऱ्याच योजना त्याच्यापर्यंत पोचत नाहीत त्यामुळे त्याचे नुकसान होते. वास्तविक पाहता काही समस्यांचे निवारण आपल्याला माहीती असते, पण आपण त्याचा अवलंब करत नाही. शेतीविषयक समस्यांच्या निवारणासाठी आर्थिक, सामाजिक आणि भावनिक बाबी लक्षात घेऊन मी काही उपाययोजना मांडत आहे. कदाचित यापूर्वीही अनेक लोकांनी त्या मांडल्या असतील. तरीही त्या सर्व शेतकऱ्यांपर्यंत मला जमेल त्या पद्धतीने पोचवणे मला गरजेचे वाटते जेणेकरून त्यांचे नैराश्य मी काही अंशी तरी कमी करू शकेन आणि एका जरी नैराश्यग्रस्त शेतकऱ्याला शेती करण्याची नवीन उमेद मिळाली तरी एक भारतीय म्हणून, एक समाज म्हणून मी शेतकऱ्यांसाठी काही तरी करू शकले याचे समाधान मला मिळेल.

शेतातल्या समस्या सुधारण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करता येऊ शकतात.

**१) शिक्षण**

आज सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे. गावांना डिजिटल करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण कित्येक शेतकरी अशिक्षित असल्यामुळे त्यांना या सोयीचा फायदा होताना दिसत नाही. पण आता शेतकरी वर्गाला मागे राहून चालणार नाही. कुठलीही नवीन गोष्ट शिकायची असेल तर वेळ हा लागतोच पण शिकण्याची इच्छाशक्ती प्रबळ असेल तर काहीच अशक्य नाही, आणि शिकण्याला वयाचे बंधन ही नसते. त्यामुळे व्यवहाराला आवश्यक आहे तेवढे तरी शिक्षण घेतलेच पाहिजे जेणेकरून कुणी आपली फसवणूक करू शकणार नाही.

**२) जोडधंदे**

फक्त शेतीवरच अवलंबून न राहता दुग्धव्यवसाय, पशुपालन, फुलशेती, फळे, भाज्या, रोपवाटिका यांसारखे व्यवसाय खूप फायदेशीर ठरतात. याचा कित्येक लोकांना फायदाही झालेला आहे. जेणेकरून शेतीमध्ये काही नुकसान झाले तरीही जोड धंद्याच्या साहाय्याने शेतीला थोडासा आधार मिळू शकतो. यासंबंधी थोर विचारवंतांनी आधीच खुप कार्य केलेलं आहे डॉ. वर्गीस कुरियन यांनी देशात धवलक्रांती घडवून आणली आणि दुग्धोत्पादनाची मोठी समस्या सोडवली. त्यांनी गरीब शेतकऱ्याला दुग्धव्यवसाय हा उत्त जोडधंदा मिळवून दिला. त्याला बारमाही रोजगार मिळेल अशी व्यवस्था केली. खरेदी विक्रीमधला एजंट नाहीसा केला. दुग्धव्यवसायासोबतच भाजीपाला, फळे, तेलबिया, जंगलांचे व्यवस्थापनही विकसित केले.

**३) ऋतुमानानुसार पीक आणि संशोधने**

सुधारित शेतीसाठी उपलब्ध असणारी नवनवीन संशोधने, बियाणे, निसर्गाचा अंदाज, कुठल्या ऋतूमध्ये कोणते पीक जास्त फायदेशीर ठरते. याबद्दलचे सर्व मार्गदर्शन उपलब्ध आहे. विविध तज्ज्ञ लोकांची शेतीवरील संशोधने ही शेतकरी मासिकात उपलब्ध असतात तसेच या मासिकांचे मोबाईल ॲप देशील उपलब्ध आहे. ज्यांना शक्य आहे ते ॲप वापरून माहिती मिळवू शकतात किंवा मासिकेही घरी मागवू शकतात. नवीन पद्धतीचे तंत्रज्ञान वापरून शेती कशी करता येईल याबद्दल व्यवस्थित माहिती या मासिकात दिलेली असते.

आता कोणी असेही म्हणेल की ज्यास आपल्या लिपीतील मुळाक्षरही वाचता येत नाही त्याने शेतकीसंबंधी काही वाचून शेती करावी ही अपेक्षा कशी करता येईल? आणि मुळात पुस्तके वाचून शेती करता येते का? तर याचे उत्तर असे आहे की ज्यांचा पिढीजात शेती हा व्यवसाय आहे किंवा ज्याला शेतीची आवड आहे त्याला शेतीची माहिती ही असतेच. पुस्तके वाचणे किंवा शिक्षण घेणे हे मार्ग शेतीला प्रगतिशील करण्यासाठी किंवा शेतीमधील मार्गदर्शनासाठी वापरले जातात. कधी कधी पुरेशा माहिती अभावी सुद्धा शेतीचे नुकसान होऊ

शकते आणि अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. तसेच फसवणूकसुद्धा होऊ शकते. त्यामुळे शेतीसोबतच मार्गदर्शन, शिक्षण, बाजारपेठांची माहिती हेसुद्धा खूप महत्वाचे आहे.

ऋतू, पर्जन्यमान, मातीपरीक्षण या गोष्टी पिकांच्या दृष्टीने विचारात घेणे खूप महत्वाचे असते. ते बऱ्याचदा लक्षात घेतले जात नाही आणि मग उत्पन्नावर याचा परिणाम होतो. लागवडीच्या तयारीपासून ते रोपांची लागवड, कीड व्यवस्थापन , खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, अंतर मशागत, पीक संरक्षण या सर्वांबद्दलची इत्थंभूत माहिती मासिकांमध्ये दिलेली असते.

अगदीच यापैकी काहीच शक्य नाही झाले तर राज्यात विविध ठिकाणी कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आलेली आहे. त्या विद्यापीठांना भेटी देऊन तेथील तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन आपण घेऊ शकतो आणि अशा मार्गदर्शनाचा आधार घेतला तर निश्चितच फायदेशीर ठरेल.

**४) दुष्काळाशी दोन हात**

दुष्काळ ही एक खूप मोठी समस्या आहे. दुष्काळ पडला की जनावरांची उपासमार सुरु होते. ज्या गाई, बैल, वासरांना स्वतःच्या लेकराप्रमाणे सांभाळलेले असते त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते तेव्हा किती वेदना होत असतील एखाद्या शेतकऱ्याच्या मनाला! हे अकल्पनीय आहे. ते फक्त तोच समजू शकतो. अशा वेळी ज्यांना शक्य आहे त्यांनी पुढाकार घेऊन गावागावात छावण्या उभ्या केल्या तर हा प्रश्न सुटू शकतो, कारण चाऱ्याची कमतरता हीसुद्धा एक समस्या आहे. तसेच कित्येक शेतकऱ्यांना दुष्काळामुळे चारापाणी विकत घेऊन जनावरे सांभाळणे परवडत नाही आणि परिणामी ते विकण्याची वेळ येते हे खूप हृदयद्रावक सत्य आहे. या परिस्थितीचा एकजुटीने त्याचा सामना करणे गरजेचे आहे.

**५ ) मत्स्यशेती**

आधुनिक शेतीमध्ये मत्स्यशेतीचे सुद्धा महत्व चांगलेच वाढत आहे. याचा फायदा कित्येक शेतकऱ्यांना होत आहे. शेतात शेततळे निर्माण केले तर दुष्काळात खूप फायदा होतो.

याच शेततळ्यामध्ये मत्स्यशेती केली तर एक उत्तम जोडधंदा होऊ शकतो. शेततळयातील पाणी खतयुक्त असल्यामुळे शेती किंवा फळबागाची उत्पादकता वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर शेततळयामधील मत्स्योत्पादनाद्वारे आर्थिक उत्पन्न वाढते. असा दुहेरी फायदा शेततळयातील मत्स्यशेतीमुळे होतो.

**६) शेतकरी मेळावे**

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षी जागतिक कृषी महोत्सवाचे आयोजन नाशिक येथे केले जाते. यामध्ये प्राचीन भारतीय कृषी विज्ञान ते आधुनिक शेती पर्यंतचे तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांद्वारे ही माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविली जाते. या कृषी महोत्सवात लाखो शेतकरी, कृषीप्रेमी, कृषी विशेषज्ञ यांचा समावेश असतो. या ज्ञानदानाच्या पर्वामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा. शेतकरी मेळाव्याच्या निमित्ताने सुद्धा शेतकऱ्यांना अनेक गोष्टींची माहिती मिळू शकते. त्यांचे शंका निरसन होऊ शकते.

नद्याजोड प्रकल्प, विहीर पुनर्भरण, वृक्षलागवड करून वनांचे क्षेत्र वाढवणे तसेच शेतमाल प्रक्रिया, बाजारपेठांची माहिती हेही आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण करावे. गावाच्या लोकसंख्येच्या गरजेनुसार पिण्यासाठी लागणारे पाणी याचा अर्थसंकल्प तयार करून त्यानुसार पिकांचे नियोजन करावे. खालील काही गोष्टीही करता येऊ शकतात जसं की,

१) एकत्र शेतीचा अवलंब

२) बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे

३) सेंद्रिय भाजीपाला व पिके घेणे

४) थेट मार्केटिंगद्वारे विक्री व्यवस्थापन

५) शेतमाल साठवणुकीसाठी शीतगृहे व्यवस्था

सकारात्मक दृष्टिकोन आणि त्याला कष्टाची साथ मिळाली तर काहीच अशक्य नाही.

अजून एक महत्वाचा मुद्दा म्हणजे मुलांची शेतीमध्ये रुची वाढावी व सर्वार्थाने शेतीविषयक जाणीव प्रगल्भ व्हाव्यात म्हणून प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शालेय अभ्यासक्रमांमध्ये बाकी विषयांप्रमाणे शेतीसाहित्यालाही प्राधान्य देण्यात यावे. असे केले तर नक्कीच मुलांमध्ये लहानपणापासूनच शेतीची आवड निर्माण होईल. शेती विषयाला एक वेगळा दृष्टिकोन मिळेल. मुलांना शेतीचे महत्व कळेल. शेतकऱ्याचे महत्व कळेल. याचबरोबर शेतकरी मेळावे हा सुद्धा शेतकऱ्यांसाठी त्यांच्या समस्या मांडण्यासाठी एक चांगला पर्याय आहे.

*************************************************************************************

# ४. पाणी फाउंडेशन: जलक्रांतीची सुरुवात

पाणी म्हणजे जीवन. पाणी सर्व जीवांना जीवदान देते. पाण्याविना आयुष्याची कल्पनाच करू शकत नाही. पाणी हा मानवी जीवनाचा मूलभूत घटक आहे. पाणी नसेल तर संपूर्ण जीवसृष्टीचे अस्तित्वच धोक्यात येईल. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्वाचा आहे. असे असले तरी दुर्दैवाने सध्या दुष्काळाचे भीषण वास्तव समोर येत आहे. त्यामुळे पाण्याची बचत कारणे जरुरीचे झाले आहे. दुष्काळासारख्या भीषण संकटाला सामोरे जायचे असेल तर सर्वांनीच प्रयत्न करायला हवे. कित्येक लोक यासाठी पुढे येत आहेत. त्यातलीच एक संस्था म्हणजे पाणी फाउंडेशन!

महाराष्ट्र राज्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ना नफा ना तोटा या तत्वावर काम करणारी संस्था म्हणजे पाणी फाउंडेशन. ही संस्था अमीर खान आणि किरण राव यांनी २०१६ साली स्थापन केली. महाराष्ट्रातील कित्येक गावांनी या संस्थेसोबत काम करून आपले गाव पाणीदार करायला सुरुवात केली आहे आणि यातूनच सुरु झालीय ती गावे दुष्काळमुक्त करण्याची मोहीम. यासोबत त्यांनी वॉटर कप स्पर्धा देशील सुरु केली आहे ही जलक्रांतीची सुरुवात हेच दाखवून देते की जोपर्यंत आपण स्वतःची मदत करत नाही तोपर्यंत दुसरे कोणीही येऊन आपली मदत करणार नाही.

या वॉटर कप स्पर्धेत कित्येक गावे सहभाग घेत आहेत. विजेत्या गावांना पारितोषिक तर दिलेच जाते पण एक गोष्ट आवर्जून सांगाविशी वाटते ती अशी की, बक्षिसाची आकडेवारी थोडावेळ बाजूला ठेऊन सहभागाचा विचार केला तर सर्वात मोठे बक्षीस सर्वच गावांना मिळणार आहे ते म्हणजे जलयुक्त शिवार, आणि मला वाटतं हेच कष्टाचं सर्वात मोठं फळ आहे. म्हणून सर्वांना आवाहन करावेसे वाटते की या स्पर्धेत सहभाग घ्या. आपले गाव जलयुक्त करण्याचा प्रयत्न करा. खचून जाऊ नका. आपण स्वतः प्रयत्न केले तर दुष्काळाचा सुद्धा नाईलाज होईल आणि त्याला मागे हटावेच लागेल.

वॉटर कप स्पर्धेअंतर्गत पाणी फाउंडेशन च्या वतीने पाणलोट विकासाचे प्रशिक्षण गावकऱ्यांना देण्यात येते. कष्टाच्या जोरावर, लोकसहभागातून, विज्ञानाच्या साथीने दुष्काळाला हरवण्याचा दृष्टीने उचललेलले हे एक मोठे पाऊल आहे. ही एक स्पर्धाच नाही तर संघर्ष आहे. लढाई आहे. पाण्यासाठी, जलसंवर्धनासाठी. पुढच्या पिढ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवायचा. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवायची असं धोरण आपण स्वीकारलं पाहीजे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र यातील जवळपास ८० तालुक्यातील गावांनी गेल्या ४ वर्षात या संघर्षात आपला सहभाग नोंदवला आहे. फक्त महाराष्ट्रातच नाही तर पूर्ण देशात ही जलक्रांती होण्याची गरज आहे आणि तेही एक दिवस नक्कीच होईल असा मला विश्वास आहे.

पाणी फाउंडेशन च्या अंतर्गत पाणलोट विकासाचे प्रशिक्षण गावकऱ्यांना देण्यात प्रशिक्षण दिल्यानंतरच गावकरी या स्पर्धेत सहभागी होतात. स्पर्धा साधारण एप्रिल आणि मे महिन्यांमध्ये ४५ दिवस चालते. या स्पर्धेत गावकरी श्रमदानाने तसेच मशीन च्या साहाय्याने जलसंधारणाच्या महत्वपूर्ण रचना उभारून पाणी साठवण क्षमता निर्माण करतात. या स्पर्धेसाठी डिसेंबर महिन्यात गावांकडून अर्ज मागवण्यात येतात. यासंबधीची सर्व माहिती पाणी फाउंडेशन च्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे या संघर्षात जितक्या गावांनी सहभाग घेतला आहे आणि एकत्रितपणे श्रमदान केले आहे, त्यात सर्व वयोगटातील व्यक्ती आहेत. स्त्रिया, पुरुष, तरुण, तरुणी, वयोवृद्ध, लहान मुले सर्वच उत्स्फूर्तपणे यात सहभागी होताना दिसत आहेत. जणूकाही सर्व मिळून दुष्काळाला आव्हानच देत आहेत की आता बघतोच कसा जात नाही ते! लहान मुलांचा हुरूप पहिला की बाकीचे लोक दुप्पट जोशाने काम करतात. हे खरंच किती कौतुकास्पद आहे.

जगात कुठलाच प्रश्न हा उत्तराशिवाय तयार होत नाही फक्त गरज असते ती उत्तर शोधण्याची. सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर उत्तर नक्कीच सापडते. २०१६ साली सुरु

झालेलं हे पाण्याचं तुफान आज कितीतरी गावांना सुखी करून गेलं आहे, आणि हे तुफान सर्वांसाठी इतकं प्रेरणादायी ठरेल असा आधी वाटलंही नसेल, पण कष्ट करण्याची तयारी, जिद्द, एकी यामधून कित्येक गावांनी हे सध्या करून दाखवले, आणि प्रबळ इच्छाशक्ती असेल तर कुठलीच गोष्ट अशक्य आंही हेदेखील सिद्ध झाले. लहान मुलांचा उत्साह बघून तर खरंच खूप कौतुक वाटते. त्यांच्या बालबुद्धीने एखादी गोष्ट ठरवली की ती पूर्ण करेपर्यंत संपूर्ण गावाची झोप उडवणारी ही मुलं पहिली की अभिमान वाटतो. त्यांना या गोष्टीची जाणीव आहे की आता काहीच नाही केले तर भविष्यात खूप मोठे जलसंकट ओढावेल. भविष्यातला हा धोका ओळखून मुलं कामाला लागली आहेत. आपल्या चिमुकल्या हातात कुदळ, खोरे घेऊन दुष्काळाशी दोन हात करायला सज्ज झाली आहेत, आणि यात फक्त गावंच नाही तर शहरातील लोकही सामील होत आहेत. तेही मोठ्या संख्येने. माणुसकी, आपुलकी, प्रेम, एकात्मता या सर्व गोष्टी नव्याने बघायला मिळत आहेत. जाती, धर्म, प्रदेश, गाव, शहर याच्या पलीकडं जाऊन एकीने सर्व एकत्र येऊन श्रमदान करत आहेत. आता श्रमदान हा एक सोहळाच झालाय जणू. यातच आला तो १मे २०१९ महाराष्ट्र दिन.आपल्या लाडक्या महाराष्ट्राचा वाढदिवस! गावागावात यादिवशी महाश्रमदान करण्यात आले. हजारोंच्या संख्येने लोक एकत्र आले आणि त्यांनी श्रमदान केले आणि तेही मनापासून. आपल्या लाडक्या महाराष्ट्राचा वाढदिवस सर्वांनी अगदी जोशात साजरा केला.

समस्या आल्या तर ते सोडवण्याचे मार्गही आपल्याकडेच असतात फक्त ते शोधले गेले पाहिजेत. देवही कोणत्या ना कोणत्या रूपाने येऊन आपल्याला मार्ग दाखवून जातो असे मला वाटते. कदाचित त्यालाही हेच अपेक्षित असतं की आपण मार्ग शोधून त्यावर चालावे, कारण बऱ्याच वेळा असं होतं की नैराश्यामध्ये माणूस अगदी टोकाचा निर्णय घेतो आणि मग त्याच्या कुटुंबाची फरफट होते.

आजही या वॉटर कप स्पर्धेतल्या भाग घेतलेल्या गावकऱ्यांच्या मुलाखती ऐकल्या की आपल्यालाही हुरूप येतो. त्यांचे कष्ट आणि कष्टानंतरचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत

असते. त्यांच्या बोलण्यातून ते जाणवते. कष्ट करण्याची इच्छा, मार्ग शोधण्याची जिद्द सर्वांमध्येच असते. गरज असते ती फक्त जाणीव होण्याची. कष्ट योग्य दिशेने केले तर यश मिळते, पण दिशा चुकली की मेहनत वेळ आणि शक्ती सर्वच वाया जाते आणि निराशा पदरी पडते. म्हणून कष्ट करणे जितके महत्वाचे आहे तितकेच महत्वाचे आहे ते योग्य दिशेने करणे. आधीचा काळ वेगळा होता. देश समृद्ध होता. पाणी मुबलक प्रमाणात होते, पण आता पाण्याची पातळी कमी होतं चालली आहे त्यामुळे त्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे होऊन बसले आहे.

पाणी फाउंडेशन चे कार्य, त्याला गावकऱ्यांचा मिळणार प्रतिसाद आणि त्यातून कष्टाचे मिळालेलं फळ म्हणजेच उभी राहिलेली जलयुक्त शिवारे पहिली की देशाचा आणि देशवासीयांच्या खूप अभिमान वाटतो. या कार्याला जलक्रांतीची सुरुवात असे म्हटले तर वावगं ठरणार नाही.

या जलक्रांतीने ४ वर्षातच इतका बदल घडवला आहे की पुढेही या उपक्रमास खूप खूप यश मिळत राहील आणि एक दिवस पुर्ण देश दुष्काळमुक्त होईल यात शंकाच नाही. एकमेकांच्या साथीने दुष्काळासारख्या संकटावर मात करण्याचे धाडस म्हणजे ध्येयपूर्तीच्या दिशेने केलेली वाटचालच नाही का? आणि ध्येय ते केवढे महान! फक्त महाराष्ट्रच नाही तर पूर्ण देश हरित झाला पाहीजे. इतके सुंदर ध्येय आणि त्याला कष्टाची जोड मिळाली तर तुम्ही आम्ही पूर्ण देश पुन्हा एकदा सुखाने समृद्धीने जलयुक्त शिवारांनी भरल्याचे स्वप्न का पाहू नये? सर्वांनी पाहावे असेच हे स्वप्न आहे. कल्पना केली तरी मनाला समाधान आणि सुखाचा ओलावा देऊन जाते.

सकारात्मक विचार, जिद्द, कष्टाची तयारी आणि योग्य दिशा मिळाली तर काय अशक्य आहे? त्यामुळे मला सर्व भूमिपुत्रांना हेच आवाहन करावेसे वाटते की मार्ग शोधा, समस्यांना सामोरे जा, योग्य मार्गदर्शन घ्या. तुम्ही स्वतःच्या विकासाच्या दृष्टीने एक पाऊल तरी उचला. तुमचे सामर्थ्य समस्यांना दाखवून द्या. मग दुष्काळासारख्या समस्या कशा जात नाहीत तेच

बघू. जिथे हेतू शुद्ध आहे, कष्ट करण्याची तयारी आहे तिथे या पावलांना कोण रोखू शकणार आहे? काहीही झालं तरी शेतकऱ्याची ओंजळ रिकामी राहता कामा नये. ती अन्नपूर्णेसारखी भरलेलीच हवी.

हे सर्व व्हायचे असेल तर आधी मनाने बळकट व्हायला हवे. काहीही झाले, कितीही संकटे आली तरी "माझ्या परिवाराला उघड्यावर टाकणारा, त्याची फरफट करणारा टोकाचा विचार मी कधीच करणार नाही." हे मनाशी पक्के ठरवा. मग बघा. तुमचा परिवारच नाही तर पूर्ण समाज तुम्हाला तुमच्या पाठीशी उभा दिसेल.

दुष्काळाशी दोन हात करताना एक गोष्ट मनाशी पक्की ठरवायची आहे की आता पाणी डोळ्यात नाही तर नदी, विहीर, तलावात पाहायचे आहे. या सुंदर भविष्याला आणि सुंदर उपक्रमाला माझ्या मनापासून खूप खूप शुभेच्छा! या लिखाणाच्या निमित्ताने हा प्रकल्प जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करून मीही या जलक्रांतीमध्ये खारीचा वाटा उचलत आहे. तसेच सर्वांना हेच आवाहन करत आहे की तुम्हीही यात थोडासा का होईना सहभाग नक्की घ्या. समाधान मिळेल. हा प्रकल्प खूप खूप यशस्वी होवो आणि भारताचे जलसंकट दूर होऊन सर्व भूमिपुत्रांना त्यांच्या कष्टाचे फळ मिळो हीच सदिच्छा.

*************************************************************************************

# ५. स्वामिनाथन आयोग: एक वरदान

स्वातंत्र्यानंतरचा भारतीय शेतीतील काळ आजही आपल्याला आठवला तरी अंगावर काटे उभे राहतात. खासकरून १९७१-७२ चा भीषण असा दुष्काळ. त्याची तीव्रता हृदय पिळवटून काढणारी. आजही त्याचे चटके आपल्याला जाणवतात. एवढ्या साऱ्या लोकसंख्येला पुरेल असा अन्नसाठा आपल्याकडे नव्हता, मग आपल्याला बाहेरून मदत घ्यावी लागली आणि जे पदरी आलं ते स्वीकारावं लागलं. ते किती निकृष्ट दर्जाचं होतं हे वेगळं सांगायला नको.

डॉ. एम. एस. स्वामिनाथन हे हरितक्रांतीचे जनक म्हणून ओळखले जातात. त्यांनी देशात हरितक्रांती घडवून आणली. ती झाली नसती तर कदाचित अजूनही आपल्याला बाहेरील देशांकडून धान्य आयात करावे लागले असते. त्यांनी भरघोस उत्पादन घेण्यासाठी गव्हाची नवीन जात शोधून काढली. त्यांनी अमेरिकेतले मान्यवर कृषितज्ज्ञ डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी विकसित केलेल्या बुटक्या जातीच्या (डार्फ) गव्हाची या देशात लागवड करण्याचा निर्णय घेतला आणि यशस्वी करून दाखवला. याबद्दल कितीतरी पुरस्कार त्यांना मिळाले पण त्याहीपेक्षा मौल्यवान होते ते असंख्य लोकांची भूक भागवल्यामुळे त्यांना मिळालेले आशिर्वाद. त्यांनी हे केले नसते तर कदाचित देशाला अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राचा करारानुसार मिळणारा वाईट प्रतीचा गहू खावा लागला असता. याच डॉ. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली दि. १८ नोव्हेंबर इ.स. २००४ रोजी स्वामीनाथन आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाने विविध अहवाल सादर केले. या अहवालात आयोगाने शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची कारणे व त्यावर उपाय सुचविले. हा आयोग शेतकऱ्यांसाठी एक वरदानच म्हणावा लागेल. स्वामिनाथन आयोगाच्या काही शिफारशी खालीलप्रमाणे

१) शेतकऱ्याच्या उत्पादनाला एकूण नफ्यातील ५०% वाट मिळायला हवा.

२) शेतकऱ्यांचे कर्ज वजा जाऊन उत्पन्न सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे असावे.

३) शेतमालाचा हमीभाव उत्पादन खर्च वगळता ५०% असावा.

स्वामिनाथन आयोगाबरोबरच लोकपाल नियुक्ती आणि लोकपाल बिल हेही महत्वाचे मुद्दे आहेत आणि जेव्हा हे मुद्दे प्रकाशझोतात येतात तेव्हा एका थोर सामाजिक कार्यकर्त्याचे नाव पुढे येते ते म्हणजे अण्णा हजारे! देशाच्या लोकशाहीला मजबूत करण्यासाठी अण्णांनी अनेक आंदोलने केली आहेत. माहितीचा अधिकार आणि लोकपाल विधेयकाच्या मुद्द्यावर त्यांनी सामान्य जनतेला एकत्रित आणण्याचे महान कार्य केले आहे. प्रत्येक राज्यात लोकायुक्त कायदा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी या प्रमुख मागण्यांसाठी अण्णा हजारे हे गेली कित्येक वर्षे लढा देत आहेत.

भारतातील निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे लोकपालाला काही स्वतंत्र अधिकार देण्याची तरतूद यात करण्यात आली आहे. यानुसार पंतप्रधानासह देशातील कोणताही अधिकारी तसेच नेते, मंत्री यांची चौकशी करण्याचा अधिकार लोकपालाला असणार आहे. देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे या विधेयकात अशा प्रकारची तरतूद करण्यात आल्याचे या समितीचे म्हणणे आहे. पंतप्रधान तसेच न्यायपालिकेला लोकपालाच्या कार्यकक्षेत आणणे अशक्य असल्याचे सरकारचे म्हणणे आहे, तर "कर नाही तर डर कशाला" असे म्हणत, अण्णा मात्र आपल्या निर्णयावर ठाम आहेत. या विधेयकानुसार कोणत्याही अधिकाऱ्याची, नेत्याची चौकशी एका वर्षाच्या आत पूर्ण करुन संबंधित भ्रष्ट नेत्याला दोन वर्षांच्या आत तुरुंगात टाकण्याची तरतूद यात करण्यात आली आहे.

माहितीच्या अधिकारातील काही तरतुदीही यात समाविष्ठ करण्यात आल्या आहेत. सामान्य नागरिकाने एखादी माहिती मिळवण्यासाठी अर्ज केला असेल तर आणि संबंधित अधिकाऱ्याने ती माहिती न दिल्यास लोकपाल किंवा लोकायुक्त संबंधित अधिकाऱ्याकडून दंड वसूल करेल आणि त्या नागरिकाला ती मदत म्हणून देण्यात येईल अशी तरतूद यात करण्यात आली आहे.

अधिकाऱ्याने किंवा नेत्याने भ्रष्टाचार केल्याचे उघड झाल्यास संबंधितांकडून दंड वसूल केला जाईल आणि तो सरकारच्या तिजोरीत जमा करण्यात येईल अशी तरतूद यात करण्यात आली आहे. इतकेच नाही तर रेशन कार्डापासून ते थेट पासपोर्ट पर्यंत आणि शहरातील रस्त्यांपासून ते ग्राम पंचायतींमध्ये भ्रष्टाचार झाल्यास त्याचीही तक्रार लोकपालाकडे केली जाणार आहे.

शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी गेले कित्येक वर्षे अण्णा लढा देत आहेत. कधी उपोषण, कधी आंदोलन अशा वेगवेगळ्या माध्यमातून त्यांचा लढा चालु आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव, लोकपाल बिल असे कित्येक प्रश्न उचलून धरले आहेत. त्यामुळे आजही अण्णांसारखी निस्वार्थी आणि देशप्रेमी माणसे देशाला लाभली आहेत यात शंका नाही.

वरील सर्व गोष्टी पाहता लक्षात येते की बळीराजा हा एकटा नक्कीच नाही. परमेश्वर कोणत्या ना कोणत्या मार्गाने त्याच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे देशातून एक ना एक दिवस भ्रष्टाचार नाहीसा होईलच यात दुमत नाही पण त्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

आयुष्यात चढउतार येतच राहतात. ते कधीच एकसारखे नसते. पण चांगल्या काळात अहंकार टाळला आणि वाईट काळात संयम ठेवला तर नक्कीच आयुष्यात संतुलन राखता येईल. माझी पुन्हा एकदा सर्व भूमिपुत्रांना कळकळीची विनंती आहे की काहीही झालं तरी चुकीचे निर्णय घेऊ नका. आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीकोनातुन बघा. ग्लास अर्धा रिकामा आहे म्हणण्यापेक्षा ग्लास अर्धा भरलेला आहे हा दृष्टिकोन ठेवा. आजूबाजूला किती दुःख आहे किती अडचणी आहेत यापेक्षा त्या कशा सोडवता येतील याकडे लक्ष केंद्रित करा, कारण सुख आणि दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांनाही सारखेच महत्व आहे. फक्त गरज आहे ते समजून घेण्याची.

आज भलेही दुष्काळ, कर्जबाजारीपणा, हमीभाव या पर्वताएवढ्या समस्या आहेत पण त्याच बरोबर जलयुक्त शिवार, कर्जमाफी, वीजबिलमाफी आणि स्वामिनाथन आयोग यासारख्या गोष्टीही अस्तित्वात आहेत. आता मी असे म्हणत नाही की या गोष्टी १०० टक्के अमलात आलेल्या आहेत पण त्यासाठी लढा चालु आहे. लोकांचे प्रयत्न, श्रमदान चालु आहे. एका दिवसात सगळं बदलणार नाही पण सर्वांनी मिळून प्रयत्न केले आणि आपापली कर्तव्ये पार पडत राहीले तर याही गोष्टी नक्की अमलात येतील. त्यासाठी संयम ठेवणे खूप गरजेचे आहे. बऱ्याच वेळा असा होतं की आपण अपार मेहनत घेऊन ध्येयाच्या खूप जवळ गेलेलो असतो. ध्येय फक्त एक पाऊल दूर असतं पण ऐन वेळी संयम सुटतो आणि आपण माघारी फिरतो आणि ध्येय गाठलं जात नाही.

म्हणून सांगावेसे वाटते की आयुष्य ही परमेश्वराने दिलेली अमूल्य आणि सुंदर भेट आहे तिचा मान ठेवा. आयुष्याला जपा. असे केले तर कदाचित परमेश्वरालाही वाटेल की या आयुष्याचे सार्थक करावे.

************************************************************************************

# ६. शेतकरी आणि समाज

आज शेतकऱ्यांच्या अवस्थेचे काही अंशी कारण हे शेतकरी आणि समाज यातील नातेही आहे. शेतकरी मुख्यत्वे आपले प्रश्न सोडवले जावे यासाठी स्वतः तर प्रयत्न करतोच पण काही गोष्टींची अपेक्षा तो सरकार आणि समाजाकडूनपण ठेवत असतो. या दोन्हीपैकी एकाने जरी प्रामाणिकपणे आणि आपलेपणाने त्याला सक्षम बनवण्याचा प्रयत्न केला तरी त्याचे बरेचसे प्रश्न सुटू शकतात, पण तसे होताना दिसत नाही. राजकारणी लोक फक्त मते मिळवण्यापुरते शेतकऱ्यांचा वापर करून घेताना दिसतात. तसेच समाजही त्यांच्याबद्दल आपुलकी दाखवताना दिसत नाही. पर्यायाने त्याला नैराश्य येते. मुलाबाळांची चिंता जगू देत नाही, आणि तो अविचाराने काहीतरी टोकाचा निर्णय घेऊन मोकळा होतो. हे खूप दुर्दैवी आहे. समाज आणि सरकार दोघांनीही हे जाणून घेण्याची गरज आहे की, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण हे सर्वांचेच कर्तव्य नाही तर काळाची गरज बनत चालली आहे.

काय अपेक्षा असेल एका शेतकऱ्याची? त्याच्या शेतीसाठी पाणी, पोषक हवामान, वीज, बी-बियाणे, खते, शेतमालाला भाव, या गोष्टी तर आवश्यक आहेतच पण याहीपेक्षा सर्वात जास्त आवश्यक आहे ती प्रबळ इच्छाशक्ती, संकटावर मात करून नव्या उमेदीने काम करण्याची ताकत, आणि मनोबल आणि या गोष्टी तर तुम्ही आम्ही मिळून नक्कीच करू शकतो.

माणसाने प्रत्येक क्षेत्रात कितीही प्रगती केली तरी निसर्ग ही एक अशी शक्ती आहे जिच्यापुढे कुणाचे काहीच चालत नाही. नैसर्गिक आपत्तींना आपण थांबवू शकत नाही. पण शेती तर पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. मग करायचे काय? आज दुष्काळ, महापूर, भूकंप, यासारख्या नैसर्गिक आपत्ती जास्त प्रमाणात ओढवण्याला आपण पण बऱ्याच अंशी जबाबदार आहोत. वाढते औद्योगिकीकरण वृक्षतोड, यामुळे पर्जन्यमान कमी झाले आहे. कित्येक गावांना दुष्काळासारख्या भीषण संकटांचा सामना करावा लागत आहे. शेतीवरही संकट ओढवले आहे.

अशा परिस्थितीत आपले पीक कसे वाचवावे? कधी कधी तर अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला घासही गमवावा लागतो. अशा कित्येक समस्या आहेत. यासंबंधी कारणमीमांसा आणि उपाय आधीच कित्येक लोकांनी सुचवलेले आहेत पण जितके तांत्रिक, आर्थिक, उपाय गरजेचे आहेत तेवढेच सामाजिक आणि मानसिकसुद्धा आहेत.

गतकाळात डोकावून पहिले तर असे दिसते की हरितक्रांतीची आधुनिक नवीन साधने श्रीमंत शेतकरी लहान व सीमंत शेतकऱ्यांपेक्षा अधिक कुशलतेने वापरतो त्यामुळे मोठ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न जास्त आणि लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन आर्थिक विषमता निर्माण झाली. काही निष्कर्षांवरून असेही दिसते की श्रीमंत शेतकऱ्यांना सहकारी संस्था, बँक यांच्याकडून सहज कृषी कर्ज उपलब्ध होते परंतु छोट्या शेतकऱ्यांना अशा वित्तीय संस्था कर्ज उपलब्ध करून देत नाहीत. परिणामी ग्रामीण आर्थिक विषमतेच्या भर पडली. तर डॉ स्वामिनाथन यांच्या मते अन्नधान्याची आयात बेरोजगारीची आयात करते.

या आर्थिक विषमतेमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आणि गरीब अधिक गरीब. याचबरोबर गरीब शेतकरी आणि समाज यात एक दारी निर्माण झाली. शहर आणि गाव याना जोडणारे रस्ते तर बनले पण शहरी लोक आणि ग्रामीण लोक यांच्या मनाला जोडणारे रस्ते कोण बनवणार हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

"सारे भारतीय माझे बांधव आहेत." असं लहानपणापासूनच छातीठोकपणे म्हणणारे आम्ही त्याच बांधवाना जेव्हा मदतीची गरज असते, तेच बांधव दुष्काळाने होरपळून निघतात, त्याच बांधवांच्या मदतीच्या कार्यात कितीतरी कोटींचा भ्रष्टाचार होतो, त्याच बांधवांना कर्जबाजारीपणामुळे या जगाचा निरोप घ्यावा लागतो, तेव्हा त्यांना मदत करणे तर सोडाच पण आपुलकीने साधी विचारपूसही कुणाला करावीशी वाटत नाही. उलट भाज्यांचे, धान्याचे भाव वाढले तर त्यांनाच दोषी ठरवले जाते. माझ्या माहितीनुसार बाकी गोष्टींच्या तुलनेत

शेतमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार तर शेतकऱ्याला नाहीच पण त्याच्या मालाचे थोडेसे भाव वाढले तरी ते कुणालाही चालत नाही, पण ज्या गोष्टी बाहेरून आयात होतात, ज्यांची किंमत त्यांच्या मूळ किमतीपेक्षा किती तरी अधिक असते, ज्या गोष्टी शुद्ध आहेत की नाही याचीही खात्री नसते, अशा गोष्टीचे कितीही भाव वाढले तरी त्याच्या ग्राहकावर कसलाही परिणाम होताना दिसत नाही. ही विषमता नाही का? आज कितीतरी लोक शुद्धता आणि ब्रँड च्या नावाखाली लोकांची फसवणूक करताना दिसून येतात. कित्येक खाद्यपदार्थ, वस्तू यांचे शुद्धतेचे दावे फोल ठरत आहेत. कित्येक वस्तू आपण ऑनलाइन मागवतो तेही मागेल त्या किमतीच्या, पण त्या खराब निघतात. मग माझा मुद्दा हाच आहे की अशा गोष्टी आपल्याला चालतात. मग ज्या गोष्टींसाठी कष्ट घेतलेले आहेत ज्या गोष्टी शुद्ध आहेत हे आपल्याला माहिती आहे त्या गोष्टींचा मोबदला एखाद्या शेतकऱ्याला मिळाला किंवा आपण मिळवून दिला तर बिघडले कुठे? मी माझ्या आधीच्या लेखनात पण हाच मुद्दा मांडण्याचा प्रयत्न होता की शेतीची उत्पादने खरेदी करताना शेतकऱ्यांशी कसलीही हुज्जत घालू नका. मिळेल त्या किमतीत घ्या. मग ते भाजी असो, फळे असो किंवा धान्य. इतकी जरी मदत आपण त्यांना करू शकलो तरी त्यांचे मनोबल वाढेल. आपल्या कष्टाच्या वस्तूची किंमत कमी केली जातेय हे बघून त्याला किती वाईट वाटत असेल! ते दुःख आपण कमी करू शकलो तर त्यांची मदत होणार नाही का? थेंबे थेंबे तळे साचे म्हणतात त्याप्रमाणे असे प्रयत्न प्रत्येकाने केले, आपल्याला जमेल त्या कोणत्या ना कोणत्या मार्गाने गरजू शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला तर नक्कीच त्यांना दिलासा मिळेल. आपल्या मनातला बंधुभावही जपला जाईल.

*************************************************************************************

# ७. लोकजागृतीची गरज

काही दिवसांपूर्वी एका छोट्या मुलाला विचारलं, "बाळा आपण चपाती, भाकरी, खातो ती गहू, ज्वारी आपल्याकडं कुठून येते? त्याचे उत्तर होते बझार मधून. मी म्हटलं बझार मध्ये कुठून येत असेल? त्याचे उत्तर होते तिथेच कुठंतरी तयार होत असेल. पण त्याला मोबाइल मात्र खूप चांगला हाताळता येत होता. हातातून मोबाइलला घेतला की तो रडायचा. त्यामुळे "बाळाचे पाय पाळण्यात दिसतात" ही म्हण येत्या काळात कदाचित "बाळाचे पाय मोबाइल मध्ये दिसतात", अशी होऊ नये याची भीती वाटते.

वरील प्रसंगावरून एक गोष्ट लक्षात आली ती अशी की आजच्या मुलांना शेताबद्दल काहीच माहिति नाही. माती काय असते त्यांना माहिती नाही. ज्या वयात आम्ही मातीत खेळलो, घराच्या अंगणात मनसोक्त बागडलो त्याच वयात आज ही मुलं मोबाइलला हेच विश्व मानून त्यात गुंतली जात आहेत. मोबाईल पलीकडे ही एक विश्व आहे. मोबाइल मधील गेम्स पेक्षाही खूप चांगले मैदानी खेळ पण असतात हे कित्येक मुलांना माहीतच नाही पूर्वी शाळेतून घरी आलो, दप्तर टाकलं की हातपाय धुऊन, खाऊ खाऊन कधी अंगणात खेळायला जातो असे व्हायचे. पण त्या अंगणाची किंवा मैदानाची जागा आता मोबाइलच स्क्रीनने घेतली आहे. ह्याचा वाईट परिणाम मुलांच्या मनावर व शरीरावर अप्रत्यक्षपणे होत आहे. मैदानी खेळ सुटल्याने मुलं शारीरिक व्यायामाला मुकत चालली आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या स्वास्थ्यावर होत आहे.

लहानपणीचा काळ खरंच खूप सुखद होता. दररोज शाळा सुटली की हातपाय धुऊन कधी एकदा खेळायला जातोय असं व्हायचं. मनसोक्त अंगणात खेळायचो. दर उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला जाण्याचा बेत असायचा. सुट्टीत खूप मजा करायची. मनसोक्त खेळायचं, पोहायचं, आंबे खायचे, बैलगाडीत बसायचं. आताची परिस्थिती पहिली की हाच काळ पुढच्या पिढीला अनुभवायला मिळेल की नाही याची शंका वाटते कारण दुष्काळाचे भयंकर

सावट सगळीकडे पसरले आहे. पाणी पिण्यासाठी आणायलाच कितीतरी किलोमीटर पायपीट करावी लागते. मग पाहायच तर सोडाच.

हे झाले लहान मुलांबद्दल, पण मोठ्यांबद्दल याहूनही अधिक धक्कादायक बाब म्हणजे काही महाभाग असेही आहेत की ज्यांना "आपल्याला शेती, माती काय असते हे माहिती नाही " याचा अभिमान वाटतो. बरं माहिती नसतील तर माहिती करून घेण्याची गरजही वाटत नाही. त्या गोष्टी तुच्छ वाटतात. या गोष्टी आम्हाला माहिती नाहीत म्हणजे आपण खूपच फॅशनेबल आणि मॉडर्न आहोत असे त्यांना वाटते. या विचारसरणीची कीव येते. ज्या गोष्टींमुळे रोज आपण जिवंत आहोत आपले पोट भरते त्याच गोष्टींबद्दल आपण अनभिज्ञ असू तर काय अर्थ उरतो अशा आयुष्याला? विचारांनी मॉडर्न अवश्य व्हावे पण इतकेही नाही की ज्या गोष्टीमुळे आयुष्य आहे तिलाच विसरून जावे. ज्या मातीत जन्म घेतला तिच्याशी नाते तर सोडाच पण ती काय आहे हेच माहिती नसेल तर तिच्याबद्दल अभिमान, प्रेम कसे निर्माण होणार? कदाचित याच कारणामुळे आपला देश सोडून परदेशात लोकांचे वास्तव्य वाढत आहे. तसेच खेड्यातील तरुणही रोजगार उपलब्ध नसल्यामुळे शहराकडे धाव घेत आहेत. यामुळे मला गरज वाटते ती लोकजागृतीची.

आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, यामुळे वृक्षतोडीचे प्रमाण वाढले. वाहनांची संख्या वाढल्यामुळे प्रदूषण वाढले. पावसाचे प्रमाण कमी झाले. आता तर बैलजोडी, बैलगाडी या गोष्टीही इतिहासजमा होतील की काय असे वाटत आहे. शुद्ध हवा, शुद्ध अन्न, शुद्ध पाणी या गोष्टी काही दिवसांनी शुद्ध राहतील का? हाही प्रश्नच आहे. सध्याचा दुष्काळ तर इतका भीषण आहे की नद्या, तलाव, धरणे, जलस्रोत आटत आहेत. पाण्यातील जलचर, पशु, पक्षी, उष्णतेने होरपळून निघत आहेत. लोकांना उष्माघातासारखे आजार होत आहेत. काही गावांमध्ये तर इतका दुष्कळा आहे की पिण्याचे पाणीही उपलब्ध होत नाही. शेतकरी आपल्या विठूमाऊलीकडे दुष्काळ निवारणासाठी साकडे घालत आहेत.

सभोवताली इतकी वाईट परिस्थिती असताना आपण सुद्धा लोकांना थोडी जरी मदत करू शकलो किंवा तशी इच्छा जरी मनात निर्माण झाली तरी खूप मोठी गोष्ट आहे. पण बाहेर इतके सगळे घडत असताना जर सर्व बघून ऐकून आपल्यात काहीही फरक पडला नाही **"मला काय करायचंय? मला तर मुबलक पाणी सांडण्यासाठी, पिण्यासाठी उपलब्ध आहे अन्न उपलब्ध आहे"** असा विचार जर कोणी करत असेल तर त्याला माणूस म्हणवून घेण्याचाही अधिकार नाही असे मी म्हणेन. देशातील अराजकता, विषमता कमी करायची असेल तर समाजात बंधुभाव निर्माण होणे खूप गरजेचे आहे. बंधुभाव हा कोणताही दबाव आणून निर्माण करता येत नाही तो मनातूनच यावा लागतो. भावनाशून्य होऊन आता चालणार नाही. कारण ही आपली संस्कृतीच नाही. निसर्गच जर कुठलीही गोष्ट देताना भेदभाव करत नाही सर्वांना सामान देतो तर आपण का करावा? माणसाने कितीही पैसे कमावला तरी तो समाधान देत नाही. पैशाने सर्व काही खरेदी करता येईल पण समाधान आणि आनंद नाही. समाधान तेव्हाच वाटते जेव्हा कोणीतरी आपल्यामुळे सुखी होते. आनंदाचेही तसेच. तुम्हाला कितीही आनंद झाला तरी जोपर्यंत तो तुम्ही कुणासोबत वाटत नाही तोपर्यंत तुम्हाला आनंद झाल्यासारखे वाटणार नाही. कधीतरी कुणाच्याही चेहऱ्यावर तुमच्यामुळे हास्य येऊ द्या. एकदा जरी असं झालं तरी ते समाधान पैशांपेक्षा मोठे असेल आणि त्या व्यक्तीने दिलेले आशीर्वाद कायम तुमच्या पाठीशी राहतील. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे भारताच्या सीमेवर लढणारी आपली सेना. आज आपले जवान स्वतःचे आयुष्य धोक्यात घालून डोळ्यात तेल घालून आपल्या सुरक्षेसाठी, आपल्या चेहऱ्यावर भयाच्या ठिकाणी हास्य राहावे म्हणून सीमेवर उभे आहेत. निस्वार्थीपणे आपले रक्षण करत आहेत. त्याचप्रमाणे शेतकरीही आपल्याला अन्न मिळावे म्हणून शेतात काबाडकष्ट करतात धान्य पिकवतात. अशा महान व्यक्तींमुळे आज आपल्या चेहऱ्यावर सुख आणि समाधानाचे हास्य आहे. आणि हेच नाही तर अजूनही असे कित्येक लोक आहेत जे दुसऱ्यांसाठी त्यांच्या सुखासाठी प्रयत्नशील आहेत. मग आपणही पुढाकार घेऊन त्यांच्या

चेहऱ्यावर हास्य आणण्याचा प्रयत्न केला तर? आणि प्रयत्न म्हणजे तरी काय? काय अपेक्षा आहेत त्यांच्या? फक्त पाठबळ मिळावे याच ना? मग आपल्याला जमेल तशी मदत आपण आपण केली तर किती चांगले होईल? इतके तर आपण नक्कीच करू शकतो

*******************************************************************************

# ८. कॅन्सरला आमंत्रण

भारतात सर्वात जास्त गव्हाचे उत्पादन पंजाब आणि हरियाणात होते. सर्वात जास्त रासायनिक खते आणि विषारी कीटकनाशके पंजाब मध्ये वापरली जातात. भारतात सर्वात जास्त कॅन्सर चे रुग्ण पंजाबमध्ये आढळतात. या कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या सोयीसाठी रेल्वेने एक स्पेशल ट्रेन चालवली आहे. ही कॅन्सर स्पेशल ट्रेन आठवड्यातून दोनदा पंजाब ते राजस्थान अशी धावते जिथे राजस्थान मधील सर्वात मोठे कॅन्सर रुग्णालय आहे. कॅन्सर होण्यामागे रासायनिक खते, विषारी औषध फवारणी, विषारी प्रतिजैविके, आणि अनावश्यक औषधे कारणीभूत आहेत. आपल्या बाजारपेठांमध्ये आलेला गहू हा अशाच रासायनिक खतांवर वाढवलेला असतो हे विसरून चालणार नाही.

या माहितीवरून आपल्या लक्षात येईल की शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक खते ही कॅन्सर ला आमंत्रण देत आहेत. सध्या सगळ्यात जास्त आजाराचे प्रमाण किडनी व कॅन्सरचे आहे. त्याचे कारण पाणी आणि रासायनिक युक्त अन्नाचा आहार हे आहे. त्यामुळे रासायनिक शेतीपेक्षा सेंद्रिय शेती ही आर्थिक तसेच शारीरिक दृष्टीने कशी महत्वाची आहे हे समजून घेणे आवश्यक बनले आहे

भरघोस उत्पादन घेण्यासाठी केला जाणारा कीटकनाशकांचा मारा, जमिनीचा कस, तिची घनता, तिचा प्रत, तर घालवतच आहे. तसेच पालेभाज्यांवरही त्याचा परिणाम होतोय. सध्या तर अशी परिस्थिती झालीय की कोथिंबिरीला सुद्धा वास राहिलेला नाही. पालेभाज्यांची आपले मूळचे गुणधर्म गमावलेले आहेत. त्यांची नैसर्गिक चव नाहीशी होत आहे. मग भाजीला चव आणण्यासाठी भरपूर मसाल्यांचा मारा केला जातो. हे थांबवायचे असेल तर जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास प्रोत्साहन दिले गेले पाहिजे जेणेकरून जमिनीचा कस तर टिकून राहीलच पण स्वतः शेतकरी, त्याचे कुटुंब आणि समाज यांनाही नैसर्गिक अन्न खायला

मिळेल. हे तेव्हाच होईल जेव्हा शेतकऱ्याला हा विश्वास मिळेल की त्याच्या सेंद्रिय उत्पादनाला बाजारात खूप मागणी असेल आणि त्याचा योग्य हमीभाव मिळेल. रासायनिक शेतीमुळे होणाऱ्या या दुष्परिणामांना शेतकऱ्याला एकट्याला जबाबदार धरून चालणार नाही. त्याच धडपड असते ती यासाठीच की भरघोस उत्पन्न मिळावे आणि त्यातून आलेल्या नफ्यातून त्याच्या कुटुंबाचे पालनपोषण तो व्यवस्थितपणे करू शकेल.

प्रथम शेतकऱ्याने सकस अन्न खाल्ले पाहिजे. त्याचबरोबर संकरित बियाण्यांपेक्षा गावरान बियाण्यांचे जतन करण्याची मोठी गरज आहे. अनेक वाणांचे गावरान बियाणे आता नष्ट झाले आहे. आज गावरान बियाणं कुठलंच नीट राहिलेलं नाही. बियाणं शुद्ध असलं तरच त्या सेंद्रिय शेतीला अर्थ! परागीकरणानं गावरान मूळ बियाणं शुद्ध राहिलेलं नाही. तशी व्यवस्थाच कधी कुणी केली नाही. तुमच्या सेंद्रिय शेती बियाण्याच्या शेजारी दुसऱ्याची रासायनिक खतांची शेती असेल तर कसं शुद्ध राहणार बियाणं? जमिनीचा आजवर निम्मा कस गेलाय. मातीची घनता कमी झालीय.

बाकीच्या राज्यांचा विचार केला तर सिक्किमने देशातले पहिले सेंद्रिय राज्य होण्याचा मिळवला आहे. सिक्किमच्या खालोखाल केरळनेसुध्दा सेंद्रिय शेतीला आपल्या राज्यामध्ये मोठा बढावा दिलेला आहे. कारण या दोन राज्यातल्या कृषीतज्ञांना आणि विशेषतः शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व लक्षात आले आहे. आज देशातले पहिले सेंद्रिय राज्य म्हणून सिक्किमला मान दिला जात आहे. सेंद्रिय पद्धतीमुळे जमीनीची सुपीकता वाढते, परिणामी उत्पन्न वाढते. रासायनिक शेतीपेक्षा खर्च कमी लागतो, परिणामी नफा जास्त मिळतो. सेंद्रिय शेती ही प्रदुषणमुक्त आहे. नैसर्गिक संसाधनांचे जतन होते, त्यांना कोणत्याही प्रकारची हानी न झाल्याने जैवविविधता टिकून राहते. सेंद्रिय शेती कमी पाण्यात जास्त उत्पन्न देण्यास सक्षम असल्यामुळे पडीक शेतजमीनी ओलीताखाली येऊ लागल्या आहेत. सेंद्रिय पदार्थांमुळे सजीवसृष्टीला कोणत्याही प्रकारची हानी होत नाही, त्यामुळे सुरक्षित अन्नधान्यांचे उत्पन्न मिळते. सेंद्रिय पदार्थांमुळे फळे,भाजीपाला यांमधील टिकाऊपणा वाढतो, तसेच चवही वाढते.

रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा कस कमी होऊ लागला. शेती उत्पन्नात घट आणि शेती उत्पादन खर्च वाढू लागला. आधुनिक बियाण्यांमुळे पारंपरिक बियाण्यांच्या जाती नष्ट होऊ लागल्या. शेतक-यांनी स्वत:च्या तसेच राष्ट्राच्या हिताचा विचार करून सेंद्रीय शेती पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आणि सर्वांच्याच फायद्याचे आहे. रासायनिक शेतीमध्ये वापरली जाणारी रसायने पिकांच्या शरीरात आणि धान्यामध्ये मिसळली जातात आणि आपण ते धान्य खातो तेव्हा ती शोषली गेलेली विषारी द्रव्ये धान्यांच्या माध्यमातून आपल्या पोटात जातात आणि त्यांचे आपल्या शरीरावर मोठे विपरित परिणाम होतात. त्यातून अनेक प्रकारची रोगराई पसरते. अलीकडच्या काळात ते परिणाम लक्षात यायला लागले आहेत आणि म्हणूनच रासायनिक शेतीपेक्षा सेंद्रिय शेतीतल्या मालाला लोकांची मागणी यायला लागली आहे. कारण सेंद्रिय शेतीतली उत्पादने विषमुक्त असतात. हे लोकांच्या लक्षात आले आहे. याही दृष्टीने सेंद्रिय शेती आपल्या हिताची ठरणार आहे. आज सिक्किम हे राज्य सेंद्रिय शेती करणारे राज्य ठरले आहे. हळूहळू देशाच्या अन्य राज्यांमध्ये सेंद्रिय शेतीचा प्रचार झाला पाहिजे.

हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. आयातीवरून आपण निर्यातीकडे वळलो. जागतिक बाजारपेठेत आपली मान उंचावली. शेतकरी सधन बनला. हरितक्रांतीमुळे आलेली स्वयंपूर्णता, संपन्नता नक्कीच उल्लेखनीय होती; पण निसर्ग व आरोग्याच्या दृष्टीने होती का? आपण आजच्या फायद्यासाठी उद्याचं भविष्य धोक्यात तर घालत नव्हतो ना? हरितक्रांतीमुळे जे उल्लेखनीय बदल झाले त्याचबरोबर पर्यावरण आणि आरोग्याच्या दिशेनेही काही विपरित परिणाम झाले.

एकंदरीत अशीच परिस्थिती आहे की, रासायनिक शेती ही शारीरिक दृष्ट्या आणि नैसर्गिक दृष्ट्या धोकादायक आहे. सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे. कॅन्सर सारखी रोगराई मुळापासून संपवयची असेल आणि निरोगी राहायचे असेल तर सेंद्रिय शेतीला जास्तीत जास्त प्रोत्साहन देणे गरजेचे झाले आहे. आता दुर्लक्ष करून चालणार नाही. आता मात्र सर्वांना प्रयत्न

करावे लागणार आहेत. शेतकऱ्याने एकट्याने करून चालणार नाही. हे जितक्या लवकर सर्वांच्या लक्षात येईल तितके चांगले. त्यामुळे कॅन्सरला आमंत्रण न देता सर्वांनी मिळून या संकटाचा खात्मा करावा हेच आवाहन मी करू इच्छिते. याबरोबरच सर्वांना निरोगी आयुष्य लाभावे हीच सदिच्छा !

*************************************************************************************

# ९. शेतकऱ्याचे मनोगत

लोकशाहीत प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य आहे. प्रत्येक जण आपले मत मांडू शकतो आणि मांडतोच. मग हाच अधिकार शेतकऱ्यालाही आहे. त्याला काय वाटतं? त्याच्या इतरांकडून काय अपेक्षा असतील? त्याचे म्हणणे काय? आणि महत्वाचे म्हणजे आजकालच्या धावपळीच्या युगात असे किती लोक सापडतील ज्यांना खरंच शेतकऱ्याचे मनोगत जाणून घेण्यात इंटरेस्ट असेल? हे सर्व प्रश्न माझ्यासाठी जितके भावनिक आहेत तेवढेच कुतुहलाचेही. त्यामुळे यांची उत्तर शोधण्याचा मी छोटासा प्रयत्न केला. मग त्या प्रयत्नामध्ये यश कितपत येईल, हे मला माहिती नव्हते पण माझ्या परीने मला जमेल तशी उत्तर शोधायचीच असा मी निर्धार केला होता. मग त्यासाठी समाजातील वेगवेगळ्या स्तरातील व्यक्तींची मते जाणून घेणे, शेतकरी प्रश्नाबद्दल घरी, आसपास, कामाच्या ठिकाणी चर्चा करणे, शेतकऱ्यांची मनोगते त्यांच्या मुलाखती वाचणे, ऐकणे असा माझा कार्यक्रम चालू झाला. त्यातूनच काही शेतकऱ्यांची मनोगते माझ्यासमोर आली आणि मला भावुक करून गेली. त्यांचे दुःख, त्यांचा त्रास, त्यांचीं सहनशक्ती, त्यांची जिद्द याचे किती वर्णन करावे तेवढे कमीच. ज्या पोटतिडकीने, आशेने ते बोलतात, आपलं म्हणणं मांडतात त्याच गंभीरतेने आपण त्यांच्या मदतीला पुढं आलं पाहिजे. याच उत्तरे शोधण्याच्या प्रक्रियेत एका शेतकऱ्याचं मनोगत माझ्या वाचनात आलं ते खालीलप्रमाणे,

**सप्रेम नमस्कार,**

मी रोजचं पोट भरण्यासाठी काबाडकष्ट करणारा "जगाचा पोशिंदा?" असे ज्याचे वर्णन केले जाते तो शेतकरी आहे. एका गावात माझी थोडी जमीन आहे. फारशी सुपीक नाही; पण नापीकही नाही. या जमिनीवर माझं जीवापाड प्रेम आहे; पण या प्रेमानं काय भागणार? पीक अवलंबून असतं ते त्या लहरी राजावर, म्हणजे आपल्या पावसावर! आजकाल तुम्ही सर्व

ऑनलाइन झाला आहात पण आमच्या भावना समजून घेण्यासाठी तुमचे मन ऑफलाईन झाले आहे म्हणून हे पत्र !

आमच्या गावाच्या जवळपास मोठी नदी, लहानसहान नद्यांना पाणी असतं, पण तेही पावसावरच अवलंबून. उन्हाळ्यात त्यापण आटून जातात त्यामुळे मृगाचं नक्षत्र आलं की, आम्हां शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागतात. कुठ दिसतोय का आमचा काळा विठोबा ! म्हणजे काळा ढग हो ! शेत नागरून ठेवायची , काटकूट काढायचं, ढेकळं फोडायची आणि पावसाची वाट बघत रहायचं. अंग उन्हात नुसतं भाजून निघायचं, पण पाण्याचा पत्ताच नही. पिण्यासाठी चार-चार पाच-पाच कोसावरून पाणी आणावे लागते. मग त्यात कधी विहिरीतलं पाणी आटलं असेल तर विहिरीत उतरून पाणी काढावे लागते. कधी कधी चालता चालताच एखादी माताभगिनी भोवळ येऊन पडते. तर कधी दुष्काळामुळे पाण्याच्या शोधात पूर्ण  दिवस कसा निघून जातो हेच कळत नाही. कधी टँकर आलाच तर त्यासाठी झुंबड उडते. भांडणं, माऱ्यामाऱ्यासुद्धा होतात.

दुष्काळाने माणसाचे तर हाल होतंच आहेत पण माणसं निदान बोलू तरी शकतात, पण आमच्या लेकरांसारख्या मुक्या जनावरांचं काय? माझ्या पावलाच्या आवाजानं माझी लाडकी जनावरं उभा राहून हंबरू लागतात. का? तर आपल्या धन्यानं आज तरी हिरवा चारा आणला असल म्हणून. पर मला रिकामं बघताच ती मुकी जनावरं गप्प बसतात. जणू काही म्हणत्यात "धनी तुमी कायबी काळजी करू नका. आलेल्या परिस्थितीला आपण मिळून तोंड देऊ". त्यांच्याकडं बघितलं की कंठ दाटून येतो.

मग कधीतरी अवचित मळभ येतं. अंग गदगदून निघतं. सोसाट्याच वारं सुटत. इतक्यात पावसाचे थेंब पटपट गळू लागतात. क्वचित कधीतरी गारा पडतात आणि गारांनी अंगण भरून जातं. सारा गाव-लहानमोठी म्हतारीकोतारी त्या पावसात न्हाऊन निघतात. पावसात फक्त शरीरच भिजतात, असं नाही; तर मनही भिजतं.

आता शेतीला लागायला हवं. भिजलेल्या जमिनीत बी-बियाण टाकायला हवं. पाऊसराजने अशी कृपा केली की रोपं तरारून येतात. पण सगळं काही अवलंबून त्या पावसावर. तेवढ्यात येईल ते पीक, मिळतील ते दाने. त्यावर सगळं वर्ष काढायचं, हेच आम्हा कोरडवाहू शेतकऱ्याच नशीब ! पोळा झाला की पाऊस सरला. उरलेल्या आठ महिन्यांत दुसरी पिक घेता येत नाही. कमी पाण्यावरची नाचणी वरईसारखी पिकं घ्यावी लागतात. त्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्याच्या नशिबी कायमचं दारिद्र्य ! कायमची उपासमार ! काय करणार ? मग सरकारकडे उंबरठे झिजवावे लागतात. कर्ज काढण्याची वेळ येते. मग ते फेडता फेडता अर्धा जीव जातो.

हे सगळं ऐकून आता मी कसा आहे विचाराल तर अजून तरी ठीकच आहे कारण माझ्या मनात अजूनतरी स्वतःचा जीव संपवण्याचा विचार आलेला नाही, पण तो कधीही येऊ शकतो अशी परिस्थिती आहे. आजपर्यंत माझ्या कित्येक बांधवांचे जीव गेले आहेत आणि अजूनही जात आहेत याकडे कोणी गंभीरपणे बघणार आहे की नाही? काही लोक आमच्या या परिस्थितीला आम्हाला जबाबदार धरतात पण आम्ही जबाबदार कसे हेच मला कळत नाही. आम्ही भोळी, भाबडी, अडाणी माणसं. सरकार आणि व्यवस्थेवर आम्ही सहज विश्वास ठेवला आणि फसले गेलो. विविध योजना, कर्जमाफी याचा फायदा प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना होणार नाही फायदा मिळेपर्यंत आमचे किती बांधव तग धरणार देवच जाणे. आम्ही सावकाराच्या कर्जाखाली बुडालो आहोत. बँकाही सहकार्य करत नाहीत.

हे झाले सरकारचे. आमचा रोष सरकार वर तर आहेच पण त्याहूनही अधिक सुशिक्षित आणि सुज्ञ  असणाऱ्या तुमच्यावर सुद्धा आहे. तुम्हीसुद्धा आम्हाला विसरून जाल असे कधी वाटले नव्हते. तुमच्याकडून आम्हाला काय अपेक्षा आहेत? फक्त आमच्या कामाला प्रतिष्ठा आणि मानसिक बळ द्या. बाकी काही नको आम्हाला. तेव्हा बघा आम्ही कसं कष्ट करतो ते. कष्ट तर आतापण करतोय पण त्यात पुरेसा उत्साह नाही. आम्हाला प्रोत्साहन देण्याचे छोटेसे

काम जरी तुम्ही केले तरी ते आमच्यासाठी आशिर्वाद असल्यासारखे आहे. आता तुम्ही विचारलं प्रतिष्ठा कशी द्यायची? अगदी सोपं आहे. एखादा शेतकरी भेटला तर प्रेमाने त्याची विचारपूस करा तुम्हाला आमच्याबद्दल काळजी आहे या जाणिवेचे मोलच आमच्यासाठी पैशापेक्षा कितीतरी अधिक आहे. तुम्ही बाजारात खरेदीसाठी आल्यावर १,२ रु चा भाव कमी करण्यासाठी जे बोलता त्याने खरंच खूप दुःख होते. असे नका बोलत जाऊ. या स्वार्थी जगात अजूनही माणुसकी जिवंत आहे हे दाखवून द्या. व्यापारी, अडती, दलाल याकडून आमचे जे शोषण होते त्यामुळे तोटा सर्वांचाच होतोय कारण ते शेतकऱ्यांकडून कवडीमोल दराने उत्पन्न खरेदी करतात आणि तुम्हाला उच्च भावाला विकतात.

असो! अजूनही आम्ही आशावादी आहोत. आमची कष्ट करण्याची तयारी आहे. आपली भूमी सुजलाम सुफलाम बनवायची आहे ना! आम्ही प्रयत्न सोडणार नाही. जीवात जीव आहे तोपर्यंत आमच्या मातीचे ऋण फेडण्याचे प्रयत्न करणार. कदाचित असाही दिवस उगवेल की आम्ही पण आमच्या मुलाबाळांना शिकवून साक्षर करू शकू, आमच्यापण जमिनी सुपीक होतील, आमचेही दिवस येतील. समाजही आमच्या या प्रयत्नात आमची साथ देईल हीच आशा. पण हे आमचं मनोगत पूर्ण होणार ? परमेश्वर जाणे ! थांबतो आता.

राम कृष्ण हरी !!

*************************************************************************************

## १०. फक्त लढ म्हणा !

जेव्हा जेव्हा शेतकऱ्याची आठवण होते तेव्हा तेव्हा डोळ्यासमोर येतो तो कष्टकरी, पोशिंदा, दयाळू, करुणेने भरलेला स्वाभिमानी माणूस! अशा वेळी मला कुसुमाग्रजांच्या कणा या कवितेतील ओली आठवतात. एका स्वाभिमानी विद्यार्थ्यांचं वर्णन खरंच किती अप्रतिम केलाय त्यात. त्यातला प्रत्येक शब्द काळजाला हात घालणारा आहे, आणि अशा प्रतिकूल परिस्थितीत आलेल्या संकटाला धर्याने तोंड देत फक्त मनोबल वाढवण्याची अपेक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक किती आणि कसे करावे तेच काळात नाही. आपल्या कवितेत कुसुमाग्रज म्हणतात,

***"ओळखलंत का सर मला?" - पावसात आला कोणी,***
***कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी.***
***क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून:***
***“गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहुन”***
***माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली,***
***मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली.***
***भिंत खचली, चूल भिजली, होते नव्हते नेले..***
***प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले***
***कारभारणीला घेऊन संगे, सर आता लढतो आहे..***
***चिखल गाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे***
***खिशाकडे हात जाताच, हसत हसत उठला..***
***पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला..***

***मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा..***

***पाठीवरती हात ठेऊन फक्त "लढ" म्हणा..***

मी स्वतःला खूप नशीबवान समजते की ही कविता आम्हाला अभ्यासक्रमात होती. खरंतर ही कविता प्रत्येक मनाच्या जवळची आहे. खूप साध्या शब्दात मांडलेली ही कविता. स्वाभिमान जपणं शिकवणारी. कठीण परिस्थितीतही जगण्याचे बळ देणारी. शाळेत शिकलेली ही कविता आयुष्यभरासाठी पाठ होऊन गेली कारण तिचा आशय, तिच्यातून मिळणारी प्रेरणा आणि तिचा साधेपणा! ही कविता खूप अप्रतिम आणि वेगळी आहे कारण कुठलीही गोष्ट किंवा कविता वाचणाऱ्याच्या मानसिकतेनुसार तिचा प्रभाव वेगळा ठरू शकतो परंतु आशय हा बदलत नाही, आणि म्हणूनच ती साऱ्यांनाच जवळची वाटते.

मला वाटतं, आज शेतकऱ्यालाही अशाच पाठबळाची गरज आहे. त्यालाही लढाई लढायची आहे. दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा, नैराश्याची लढाई. त्याच्याही जास्त अपेक्षा नाहीत फक्त सर्वांनी पाठबळ द्यावे हीच काय ती अपेक्षा! आपण सगळे मिळून इतके तर सहज करूच शकतो. हे करण्याची शिकवण फक्त ही कविताच नाही तर आपला पूर्वापार चालत आलेला इतिहासच आपल्याला देतोय.

इतिहास पाहीला तर छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण शेतकरी दृष्टीने कल्याणकारी होते. स्वराज्यातल्या रयतेच्या हिताची आणि जीविताची काळजी घेणारे धोरण अंमलात आणणारे छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वार्थाने लोककल्याणकारी राजे होते. त्यांच्या स्वराज्यात रयतेला त्रास देणाऱ्यांचा बंदोबस्त झाला. रयत सुखी झाली. राजा आणि रयत यांच्यात मध्यस्थ राहिला नाही. कोणत्याही परिस्थितीत लष्कराने किंवा महसुली अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याकडून धान्य, भाजीपाला फुकट घेवू नये, असे त्यांचे सक्त आदेश होते. रयत सुखी तर राजा सुखी, शेतकरी सुखी तर राजा सुखी हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे प्रधान सूत्र होते. शेतकऱ्यास खऱ्या अर्थाने बळीराजा करून **"माझ्या शेतकऱ्याची गवताची काडी सुध्दा**

**कोणाकडे गहाण पडता कामा नये"** असे उदात्त विचार शिवाजी महाराजांनी ह्या महाराष्ट्रभूमीस घालून दिले आणि स्वतः त्यांनी ते जगाला दाखवुन दिले. तोच काळ पुन्हा आणण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनीही तेच मनोबल घेऊन लढण्याची गरज आहे

**"रात्रन्दिनी आम्हास युद्धाचा प्रसंग"** म्हणत सामना करावाच लागेल. लक्षात ठेवा 'जो लढतो तोच अंतिम विजयी होतो.'

एक ना एक दिवस बदल नक्की घडेल असा मला विश्वास आहे. तो दिवसही दूर नाही जेव्हा परत एकदा **"पळती झाडे पाहुया, मामाच्या गावाला जाऊया"** हे सत्यात उतरेल. झाडे परत एकदा पळताना दिसतील, मामाचा गाव परत एकदा पाणीदार झालेला आणि हिरवळीने वेढलेला असेल. मुलं परत एकदा मोबाइलला सोडून निसर्गाकडे, माणसांकडे आकर्षिली जातील. आपणही पैशात, वस्तूत आनंद शोधण्यापेक्षा तो माणसात आणि नात्यात शोधायला शिकू. हे सुंदर स्वप्न सर्वांनीच पाहावे आणि सत्यात उतरवण्याचा प्रयत्न करावा हीच आशा.

स्वतःच्या मनगटावर विश्वास असणाऱ्यांना दुसऱ्याच्या सामर्थ्याचा भीती कधीच वाटत नाही आणि अशा माणसाला हरवण्याची धाडस नियती सुद्धा करत नाही. मला जितका विश्वास शेतकऱ्यांच्या मनगटातल्या बळावर आहे तितकाच विश्वास समाजावरही आहे. याच समाजाने कितीतरी थोर व्यक्तींना घडवण्याचे महान कार्य आजवर केलेले आहे. त्यामुळे भविष्यातही शेतकऱ्याच्या समृद्धीत समाजाचा सिंहाचा वाटा ठरणार हे नक्की. शेतकरी जगला तरच देश जगेल हे विसरून चालणार नाही.

भविष्यातला धोका लक्षात घेऊन तसेच आपल्या बांधवांबद्दल सामाजिक बांधिलकी दाखवत समाज बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहावा तसेच बळीराजाही खचून न जात धाडसाने सर्व संकटाना तोंड देत कायम सुखी राहावा, त्याची उत्तरोत्तर प्रगती होत राहावी, आणि खऱ्या अर्थाने **अन्नदाता सुखी भव:** हे सत्यात उतरावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!

**************************************************************************************



मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला शतकांपुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.